परस्परं भावयन्तः
म प्र
मराठे प्रतिष्ठान, मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक १३९ ✿ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✿ सप्टेंबर २०२४

Website : www.marathepratishthan.org (फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय

**प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना माझा स्नेहपूर्वक नमस्कार.**

*वैशाखमासी प्रतिवर्षी येती*
*आकाशमार्गी नव मेघपंक्ती,*
*नेमेचि येतो मग पावसाळा*
*हे सृष्टीचे कौतुक जाण बाळा*
*असा पावसाळा बरसून गेला.*

'नेमेचि येतो मग पावसाळा, हे सृष्टीचे कौतुक जाण बाळा' असा पावसाळा बरसून गेला. वरुणाची कृपा झाली. नद्या-नाले, सर्व पाणीपुरवठा करणारी धरणे पाण्याने भरली. बळीराजा सुखावला. पवित्र अशा श्रावण महिन्यात व्रत-वैकल्ये, पूजा-अर्चा, उपास-तापास यांना फार महत्त्व आहे. असा श्रावण महिना सरल्यावर आता भाद्रपद मास आला आणि आपणा सर्वांना गणपतीबाप्पाचे वेध लागले. गणपतीबाप्पा हे सर्व वयोगटातल्या मंडळींचं लाडकं दैवत! त्यामुळे घरोघरी श्रींच्या आगमनाची जय्यत तयारी केली जाते. सारं घर मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने लाडक्या बाप्पाच्या स्वागतासाठी-पूजेसाठी सहभागी होत.

श्री गणपती हा शुभकार्याचा 'प्रारंभ' आहे, सौख्याचा आणि सुखाचा आरंभ आहे. सर्वत्र कुशल-मंगल-शुभ घडणार आहे, सर्वत्र सौख्याचा, आनंदाचा सुगंध दरवळणार आहे याचंही तो 'सुतोवाच' आहे. गणपती हे महाराष्ट्राचं लाडकं आराध्य दैवत आहे. सर्वत्र गणेशोत्सव थाटामाटात साजरे केले जातात. आपली कला व आपला आनंद या उत्सवाद्वारे प्रदर्शित केली जाते. लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सव आणि शिवजयंती हे राष्ट्रीय उत्सव प्रबोधनासाठी करावेत, हा हेतू ठेवला होता. पण आज मोठाल्या आवाजाने डीजे, डिस्को लावून ध्वनीप्रदूषण वाढवले जाते. तापदायक प्रकाराने सणांचे पावित्र्य, शुचिता कमी होते. बुद्धिमंतांच्या भूमीतील बेपर्वा वृत्तींनी गणेशोत्सव बिघडत चालला आहे त्याचे वाईट वाटते. राष्ट्रीय उत्थानासाठी ज्याचा अतिशय सुलभ उपयोग होऊ शकेल, असे उत्तम गल्लीबोळातील व्यासपीठ सर्वार्थाने वाया जात आहे त्याची खंत वाटते. व्यक्तिगत सुधारणा व प्रयत्न यासाठीच डोळसपणे गणेशोत्सव साजरा केला जावा, असे वाटते. असो.

''गणानां त्वां गणपति हवामहे'' हे गणेशा तू तत्त्व आहेस, तू प्रत्यक्ष ब्रह्म आहेस, तू आत्मा आहे, तू ज्ञानमय - विज्ञानमय आहेस. एकच तू सर्व काही आहेस. अशा या मंगलमूर्ती गणपतीबाप्पांना मनोभावे वंदन करतो. सर्व कुलबांधवांना गणपती उत्सवाच्या शुभेच्छा देते.

आपली शुभचिंतक
**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे,**
(दि. ४ सप्टेंबर २०२४)
भ्रमणध्वनी : ९८२०२ ३२०८२/८४३३६ ७४८२७

संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०००३१
दूरध्वनी : ८४३३६७४८२७ • ई-मेल : hitguj@marathepratishthan.org
मुद्रक : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई - ४०००३१

# अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण करीत असलेल्या दैनिक हिंदुस्थान आणि माझा ऋणानुबंध

• संजय रामचंद्र मराठे (पृ. ४१६), अमरावती
भ्रमणध्वनी : ९४२१७४०८९४

**दै.** हिंदुस्थान माझा मोठा भाऊ. तो पंचाहत्तरीत प्रवेश करतोय तर मी बहात्तरीत. हिंदुस्थान माझ्या काकांचे साहित्यिक अपत्य. त्या अर्थाने तो माझा भाऊ.

आमचे वडील रामचंद्र (नाना) आणि बाळकृष्ण (बाळासाहेब/आप्पा) खास स्नेही. बाळासाहेब मराठे यांच्याकडे नाना पौरोहित्य करायचे. दोन्हीही मराठे घराण्याचा पिढीजात घरोबा. जो आज तिसऱ्या पिढीत ही कायम आहे. तसे मराठे कुलवृत्तांतानुसार कोकणातील आमची घराणी वेगवेगळ्या गावची. ते कळंबुशीचे तर आम्ही वेंगुर्ल्याचे. पण घरोबा इतका दृढ की आमच्या आताच्या पिढ्या सरळ चुलत घराणेच सांगतो. तसे आता दुसऱ्या तिसऱ्या पिढीत लग्न संबंधाने नातीही आहेत.

बाळासाहेब स्वातंत्र्य लढ्यातील एक अग्रणी स्वातंत्र्यसैनिक तर आमच्या वडिलांचे, नानांचे हिंदू महासभेच्या माध्यमातून योगदान. नाना बरीच वर्षे प्रांताध्यक्ष होते. दोघांच्यामध्ये आणखीन एक समान धागा म्हणजे दोघांवर काही वर्षे प्रतिगामी ब्राह्मणांनी बहिष्कार घातला होता. आप्पांनी कुष्ठरोग निर्मूलन आणि कुष्ठ रूग्णांच्या सेवेचे कार्य केले म्हणून आणि नानांनी विधवा पुनर्विवाह आणि स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला म्हणून. परंतु काही काळानंतर सर्वच स्तरातील पुरोगामी या दोघांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिल्याने तो बहिष्कार मागे घ्यावा लागला.

माझे वडील बंधू वामनराव (बाबा) आणि डॉ. अरुणदादा समवयस्क. माझे दुसरे बंधू महादेव (बाळू काका) हे अरुणदादा आणि उल्हासदादा यांचे मित्र. जेव्हा हिंदुस्थान प्रेस शाम चौकात होता तेव्हापासून ते खापर्डे बगिच्यात हिंदुस्थान कार्यालय गेल्यावरही नेहमीच जात.

माझा अरुण दादा आणि हिंदुस्थानशी जास्त संबंध आला तो साधारणतः १९८० पासुन. नागपूर टाईम्सचे जिल्हा प्रतिनिधी आणि पत्रकार श्याम देशपांडे यांच्यामुळे. मी त्याच्या सोबत हिंदुस्थान कार्यालयात जाऊ लागलो. श्याम वयानी माझ्यापेक्षा बराच मोठा. पण भ्रमंती, पक्षी निरीक्षण, पत्रकारिता आणि नाटक यामुळे आम्ही मित्र झालो. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या महाविद्यालयात मी प्राध्यापक म्हणून रुजू झाल्यावर व्यायाम शाळा आणि कॉलेज संबंधित आणि तिथे होणाऱ्या विविध कार्यक्रमांचे वार्तांकनही करू लागलो. अरुण दादा नियमित स्विमिंगला यायचे. मी तिथे इनचार्ज असल्याने दादांची नियमित भेट व्हायची दादांनी माझ्यातील लेखनगुण ओळखून मला लिहिण्यासाठी प्रेरणा आणि प्रोत्साहन दिले. त्याकाळात मी रविवारच्या दै. हिंदुस्थानच्या साहित्य मैफिलसाठी हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या विविध योजना, तिथे झालेले विविध कार्यक्रम आणि तेथील विभागवार लेख लिहिले जे दै. हिंदुस्थान मध्ये प्रकाशित झाले.

कलाकार, लेखक, वक्ते यासाठी काही जन्मजात गुण असावे लागतात, पण तेवढेच पुरेसे नसते. त्यासाठी मार्गदर्शन, प्रेरणा आणि प्रोत्साहनही आवश्यक असते. मराठी लेखनासाठी अरुण दादांनी आणि हिंदी लेखनासाठी माझे गुरु प्रा. डॉ. रा. ही. तिवारी यांनी ते कार्य निस्वार्थपणे केले. या दोघांच्या मुळे मी हिंदी आणि मराठीतून प्रकाशित, सुमारे शंभरच्या वर लेख लिहिलेत. आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय स्तरावर मी दहाच्या वर शोधपत्रे सादर केलीत. माझा भाऊ दै. हिंदुस्थानबद्दल सांगायचे झाल्यास, सुरुवातीला बातम्या, नंतर अप्पुचा दोस्त आणि संजय उवाच या टोपणनावाने आणि नंतर संजय रामचंद्र मराठे या मूळ नावाने. असे सुमारे शंभरच्या वर लेखन दैनिक हिंदुस्थानसाठी केलेले आहे. तसेच दै. हिंदुस्थानच्या दीपोत्सव या दिवाळी अंकात सात लेख प्रसिद्ध झाले आहेत

माझा मराठीतील पहिला लेख संग्रह **माझ्या लेखन प्रवासातील मैलाचे दगड** हा मी वंशपरंपरेने माझ्यात जे लेखन गुण आले ते माझे आजोबा कै. वामन शास्त्री मराठे, यांना आणि ज्यांनी माझ्याकडून लेखन कलेची मुळाक्षरे गिरवून घेतली त्या डॉ अरुण मराठे व डॉ.रा. ही. तिवारी याना अर्पण केले आहे.

पुनश्च दैनिक हिंदुस्थानला अमृत महोत्सवी वर्षातील पदार्पणासाठी भरभरून हार्दिक शुभेच्छा

# मॅट्रिमोनिअल साईट वरील जुन्या प्रोफाइलचा कचरा

◆ वैभव मराठे, नाशिक
भ्रमणध्वनी : ८८५६०७०४६१

**आ**जकाल जो उठतो तो विवाहसंस्था स्थापन करतो. कोणी व्हाट्सअप ग्रुप बनवून समाजिक काम करण्याचा आव आणून अप्रत्यक्षपणे पैसे कमवण्याचे पाहत आहे. रोज नवनवीन ग्रुप सुरू, वाजवी दरात matrimony site apps तयार करून मिळते. माहितीची देवाण-घेवाण होते. कोणी विवाह इच्छुक तरुण-तरुणीने एखाद्या ग्रुपवर माहिती टाकली की ती माहिती पूर्ण राज्यात पसरते. मग दिलेल्या फोननंबरवर त्यांना फोन यायला सुरुवात होते. आम्ही अमुक अमुक विवाह संस्थेतून बोलत आहेत. तुमच्या प्रोफाईलला अशी स्थळे आमच्याकडे उपलब्ध आहेत. आणि सदर व्यक्ती त्या संस्थेत नाव नोंदणी करते. एकदा नोंदणी झाली की परत फोन येत नाही. मग त्यांना ग्रुपवर किंवा website वर login id password दिला जातो. मग सदर व्यक्ती त्या वेबसाईटला लॉगईन करून profile search करते. अनेक प्रोफाईल पहायला मिळतात मात्र त्यातील प्रोफाईल जरी व्हेरिफाइड असल्या तरी ६०% हून अधिक लोकांची लग्नं झालेली असतात. कोणाची लग्नं होऊन अनेक वर्ष झालेली असतात आणि विवाह इच्छुक उमेदवार किंवा पालक अनेक ठिकाणी फोन करून थकतात.

मग प्रश्न निर्माण होतो की ह्या अनावश्यक प्रोफाईल delete का केल्या जात नाहीत आणि सदर विवाह संस्थेत फोन केल्यावर उत्तर मिळते की त्यांनी आम्हाला कळवले नाही. आम्ही काही करू शकत नाही. अनेक नामांकित विवाह संस्थेत, matrimony वेबसाईट वर अशा अनावश्यक प्रोफाईल वर्षानुवर्ष वाढत आहेत. विवाह इच्छुकांना त्याचा त्रास वाटतो पैसे मोजून देखील पैसे उगीच वाया गेले असे वाटते.

(यासाठी अशा प्रोफाईल delete केल्या जात नाही) आजकाल तंत्रज्ञान वापरून प्रोग्राम सेट करून ज्या प्रोफाईलवर अनेक दिवसापासून कोणतीही ॲक्टिव्हिटी होत नाही अशा प्रोफाईल काढून टाकल्या जाऊ शकतात किंवा सर्व विवाह मंडळ वेबसाईट, app वर रजिस्टर प्रोफाईल त्यांनी निवडलेल्यां plan प्रमाणे कालावधीसाठी चालू ठेवावीत. मुदत संपल्यानंतर ती काहीकाळ invisible होतील. नंतर काही दिवसांनी delete होईल (जसा मोबाईलच्या रिचार्जची व्हॅलिडिटी संपल्या नंतर आधी इनकमिंग चालू राहते नंतर थोडे दिवसांनी सिम बंद होते तसे)

अशा प्रकारे ज्याला प्रोफाईल पुढे चालू ठेवायची आहे तो पुन्हा पैसे भरून प्रोफाईल तयार करेल. यामुळे विवाह मंडळाचे उत्पन्न वाढेल तसेच ज्यांनी रजिस्टर केले त्यांना फ्रेश प्रोफाइलचे कॉन्टॅक्ट मिळतील. वर उल्लेख केल्याप्रमाणे मनस्ताप पण होणार नाही.

---

## कॉफी

निमित्त असतं कॉफीचं
चार क्षण एकत्र जगण्याचं

कधीही... कुठेही... केव्हाही भेटावं
कोणत्याही विषयावर दिलखुलास हसावं
वाटलंच तर थोडं भांडावं...
निमित्त मात्र कॉफीचं

फेसाळलेली कडवट चव.. पण भाषा मात्र गोडच गोड
गप्पांचा मग रंगतो फड... कधी दोघंच...
तर कधी चौकडी थोर

विचारांच्या गुंत्यात गुंतल्यावर...
एकटेपणाची सोबत ती
कडक जरी वाटली... तरी
मधुर चवीची असते ती

चार घटका स्वत:त हरविण्यासाठी
निमित्त असतं कॉफीचं...



# बहुतांश व्यापारी समाजांसमोरील मोठे आव्हान-
# मनाचे व्यवस्थापन आणि एकूण विकास

• डॉ. गिरीश जाखोटिया (पृ. १२९) भ्रमणध्वनी : ९८२००६२११६

नमस्कार मित्रांनो ! शीर्षक मोठे आहे कारण विषयाचे गांभीर्यही मोठे आहे. म्हणून लेखही मोठा आहे. बहुतेक व्यापारी समाजांमधील अनेक मुले आज जवळपास सर्वच परीक्षांच्या मेरीट लिस्ट्स मध्ये झळकताहेत. वैद्यकीय, अभियांत्रिकी, संशोधन, कार्पोरेट वित्त, बँकिंग, अध्यापन, व्यवस्थापन, कला इ. नवनवीन क्षेत्रांमध्ये या समाजातील अनेक तरुण मुले व मुली चांगलं करिअर करताहेत. परंतु अजूनही बराच मोठा पल्ला या समाजांना गाठायचा आहे. या समाजांमध्ये सर्वांनाच उत्तम उच्च शिक्षण, उत्तम कार्पोरेट नोकऱ्या किंवा परदेशी जाण्याची संधी मिळत नाही. सगळ्यांनाच उद्योगवृद्धीसाठी योग्य व्याजदराने पुरेसे भांडवल मिळत नाही. बहुसंख्य युवक तडजोडी करत गावीच नव्या वाटा शोधण्याचा किंवा मोठ्या शहरात जाऊन जमेल तसे बस्तान बसविण्याचा प्रयत्न करतात. वेगाने बदलणाऱ्या आर्थिक, सामाजिक व राजकीय वातावरणात आपल्या कुटुंबाचा पारंपरिक उद्योग किंवा व्यवसाय चालविण्याचा अथवा वाढविण्याचा नवा रस्ता यांना सहजपणे सापडत नाही. बऱ्याच कुटुंबांमध्ये पुरेसे आत्मिक व व्यावसायिक समाधान हल्ली नसते. भविष्याबद्दलचे ठोस आराखडे हे बनवू शकत नाहीत. एका मोठ्या संक्रमणातून हे समाज आज जाताहेत. या बहुतेक समाजांमध्ये जीवनोद्देशांबद्दल बराच वैचारिक गोंधळ आहे. या सर्व गोष्टींचे खोलात जाऊन विश्लेषण करताना असे आढळते की बहुतेकांचे मनाचे व्यवस्थापन नीटपणे होत नाही. बुद्धी फक्त तल्लख असून पुरेसे नसते, मनाची स्पष्ट आणि खंबीर बैठकही आवश्यक असते. मनाच्या संतुलित व्यवस्थापनासाठी सुयोग्य तत्त्वज्ञानाचा आधार लागतो.

बहुतेक व्यापारी समाज हे कालचा अवडंबरात्मक इतिहास आणि आजची वैज्ञानिक प्रगती या दोहोंना जुळविण्याच्या केविलवाण्या प्रयत्नात अडकलेले आहेत. अंधश्रद्धा, अवडंबर, स्त्रियांचा अनादर आणि अन्यायी चातुर्वर्ण्य व्यवस्थेची भलामण करणाऱ्या गोष्टींना हे बहुतेक समाज आपल्या जगण्याच्या तत्त्वज्ञानातून वगळण्याचा पुरेसा प्रयत्न करत नाहीत. यांना व्यापार करण्यासाठी आधुनिक साधनांचा व धोरणांचा उपयोग तर करायचा असतो परंतु अंधश्रद्धांच्या व अवडंबरांच्या कचाट्यातून हे आपल्या मनाची सोडवणूक करू इच्छित नाहीत. बहुदा बरेचजण आपापल्या उपयोगितेच्या सिद्धांतानुसार अंधश्रद्धांना वापरत असतात! स्वतः चतुर असूनही हे सामान्य तर्कांचा वापर करून भोंगळ गोष्टींना टाळत नाहीत. एक साधी गोष्ट घ्या. या समाजांचे बहुतेक सदस्य हे आध्यात्मिक समाधानासाठी उत्तर भारतीय पवित्र स्थानांना नियमितपणे भेटी देतात परंतु त्याच उत्तर भारतातील बव्हंशी क्षेत्रांमध्ये सर्व प्रकारचा मागासलेपणा आजही गंभीर मात्रेत का दिसतो, या गोष्टीचा हे साधा तार्किक विचार करत नाहीत. परदेश पर्यटनात हे स्वच्छ – सुंदर नद्या पाहतात परंतु आपल्या देशातील बहुतेक पवित्र नद्या या स्वच्छ का नाहीत, याचं सामान्य विश्लेषण हे सहसा करत नाहीत. 'राष्ट्रनिर्माणा'साठी हे यथोचित देणग्या देतील परंतु 'देशा'चे उन्नतीकरण हे 'राष्ट्रां'त कसे होते, याची सुस्पष्ट कल्पना बहुतेकांना नसते. 'बोलवा' किंवा 'नवस'पूर्ती करण्याची श्रद्धा अंमलात आणताना जेवढी ऊर्जा, पैसा व वेळ हे गुंतवतात, तेवढीच ती उद्योजकीय कल्पना व वृद्धीसाठी हे गुंतवत नाहीत. राम – भरत – लक्ष्मण यांच्या बंधुभावाची हे रोज तरफदारी करतात परंतु यांच्या बहुतेक कुटुंबांमध्ये ती पूर्णांशाने दिसून येत नाही. यांना 'कृष्ण'सुद्धा नीटपणे कळलेला नसतो. ईश्वर सर्वत्र आहे असे मानताना हे विविध धारणांनी, कारणांनी आणि अपेक्षांनी विविध देवांची आराधना करण्यातून मानसशास्त्रीय समाधान मिळवत राहतात. सुयोग्य 'अध्यात्मा'ने खरेतर मनाचा खंबीरपणा वाढायला हवा. मुळात गडबड अशी होते की यांच्या अनेक बाबा, बापू आणि आचार्यांच्या 'तत्त्वज्ञानात्मक मर्यादा' या खूप मोठ्या असतात. (काही सन्माननीय अपवाद हे नेहमीच असतात.) या तथाकथित 'ज्ञानमहर्षीं'चे स्वतःचे वाचन, चिंतन, मनन हे तोकडे असते. काही विशिष्ट ग्रंथांपलिकडे हे जात नाहीत. साऱ्या ज्ञानाचे आम्ही 'धनी' आहोत, हा यांच्यापैकी बहुतेकांचा अभिमान

असतो. श्रद्धांच्या नावाखाली हे बेमालूमपणे अंधश्रद्धांचे वितरण व पोषण करीत राहतात. बिझनेस गव्हर्नंस आणि फॅमिली गव्हर्नंसचा मेळ घालण्यासाठी हे आपल्या यजमानांना मार्गदर्शन करु शकत नाहीत. यजमानाच्या कुटुंबातील फूट हे टाळू शकत नाहीत. अनेक अडचणींवर मात करीत जीवन जगण्याचा यांचा प्रॅक्टिकल अनुभव हा दुर्लक्षणीय असतो. बहुतांश व्यापाऱ्यांना आपल्या रोजच्या 'व्यापारी टेंशन'मधून सवड मिळत नसल्याने व तशी व्यापारी गरजही नसल्याने पूर्ण सांस्कृतिक व सामाजिक सत्य यांना कळलेले नसते नि म्हणून यांच्या गुरूंचे फावते. 'उपयोगिता' आणि 'सांस्कृतिक - धार्मिक समाधान' ही दोन परिमाणे वापरत हे व्यापारी यजमान आपापल्या गुरूंचा आदर बाळगत राहतात. यामुळे घाण्याच्या बैलासारखी अनेक व्यापाऱ्यांची अवस्था होते. झापडबंद वृत्तीमुळे मग नवा विचार येणार कुठून? भोंगळ प्राचीन कथांच्या भडिमाराने अनेक व्यापाऱ्यांचा सांस्कृतिक अभिमान फक्त सुखावतो. या अभिमानजन्य अवस्थेमुळे तार्किक विचारशक्तीही कमजोर होते नि त्यामुळे हे दूरचा 'व्युहात्मक विचार' करू शकत नाहीत. बहुतेक व्यापारी समाजांच्या मासिकांचा बौद्धिक व व्यावसायिक स्तरही यामुळे जेमतेम असतो.

बहुतांश व्यापारी कुटुंबांमध्ये जेव्हा एखादा सदस्य मृत्यू पावतो तेव्हा त्या संबंधीचा 'शोकसंदेश' पडताळून बघा. त्यात बहुतेक वेळा कुटुंबातील एकाही स्त्री - सदस्याचे नाव नसते. बाप वारल्याचे दुःख जेवढे मुलाला होते, तेवढेच दुःख मुलीलाही होत असते. उत्तर भारतीय पट्ट्यात जी अन्यायी चातुर्वर्ण्यव्यवस्था, भयंकर अंधश्रद्धांची रेलचेल आणि स्त्रियांच्या अनादराची पद्धत विकसित झाली आहे ती बहुतांशाने व्यापारी समाजांच्या मानसिकतेवर आरुढ झालेली आहे. अशा अमानवी पद्धती मांडणाऱ्या ग्रंथांची बहुतेक व्यापाऱ्यांना माहितीच नसते. भारतीय उपखंडात अन्यायी पुरुषी वर्चस्वाची स्थापना होण्यापूर्वी स्त्री - पुरुष समानता इथे अस्तित्वात होती, हे अनेकांना ज्ञात नसते. जातींच्या उतरंडीत हे भलेही कुठेतरी मध्ये किंवा खाली असतील परंतु विनाखेद हे या व्यवस्थेचा जयजयकार करत राहतील. यांची मुले कितीही हुशार व कर्तृत्ववान असोत, जातव्यवस्थेमध्ये ती कुठेतरी बसवलेली असतील. परकीय आक्रमक हे अंधश्रद्धा आणि अवडंबरांनी पराभूत झाले नाहीत. त्यांनी इथे सातशे वर्षे राज्य केले. कारण आम्ही वैज्ञानिकदृष्ट्या मागासलेले व सामाजिकदृष्ट्या दुभंगलेले होतो. बहुतेक व्यापारी समाजांना ही वस्तुस्थिती ज्ञात असूनही ते आज अवडंबरांच्याच सापळ्यांत स्वतःला अडकवून ठेवणे पसंत करतात. बहुतेकांना आपला पूर्वेतिहास हा नीटपणे माहीत नसतो. उदाहरणार्थ, शक - हूण - कुशाण हे बाहेरून आले आणि उत्तरेत मोठ्या संख्येने स्थायिक झाले. म्हणजे 'वंशशुद्धी' ही जगभरात साधारणपणे आज कुठेही अस्तित्वात नाही. काही व्यापारी समाजांच्या व्हाट्सएप ग्रुप्सवर मी जेव्हा 'वंशशुद्धी'च्या चर्चा वाचतो तेव्हा माझी सखेद करमणूक होते. हेच व्यापारी व त्यांचे कुटुंबीय जेव्हा प्रगत देशांचा प्रवासी दौरा करतात तेव्हा एक प्रकारच्या सांस्कृतिक व वैज्ञानिक न्यूनगंडाने हे पछाडलेले असतात. तिथे कंटाळा येऊ लागला की मग हे 'देशी संस्कृती'चा जयघोष सुरु करतात नि मायदेशी परततात. यांची तरुण पिढी माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करीत संपूर्ण जगाला, भिन्न भिन्न संस्कृतींना, वेगवेगळ्या प्रकारच्या उत्तम उद्योजकीय समुहांना पाहते आहे. यामुळे सरकारी आशीर्वादाने किंवा कुटील कारवायांनी मोठे झालेले उद्योगपती या पिढीला आपले 'आदर्श' वाटत नाहीत. खरा उद्योजकीय पराक्रम या पिढीला कळू लागला आहे. या नव्या पिढीला 'सात्त्विकते'ची ढोंगी व्याख्या आवडत नाही. शाकाहारामुळे सात्त्विकता वाढते, हा 'अवैज्ञानिक व अविवेकी' प्रचार या पिढीला लक्षात आलाय कारण अनेक शाकाहारी व्यापारी हे पूर्ण कर भरत नाहीत, पूर्ण विक्रीही दाखवत नाहीत.

मोठी महत्त्वाकांक्षा नसल्याने हे नियमितपणे छोट्या परिघात वावरत राहतात. यामुळे जो अधिकचा वेळ मिळतो तो यांच्या सामाजिक - सांस्कृतिक भावबंधात बराचसा गुंतवला जातो. उद्योजकीय कामगिरीचे मोठे 'बेंचमार्क्स' यांनी ऐकलेले असतात परंतु तिथपर्यंत पोहोचण्याच्या प्रक्रिया जाणून घेण्याची यांची मानसिकता नसते. आदित्य बिर्ला, मुकेश अंबानी, अमेझॉन, मायक्रोसॉफ्ट इ. उद्योगपती व महाकाय कंपन्यांचे कौतुक करताना हे थकत नाहीत परंतु तशीच 'निर्मिती' आपण करावी असे स्वप्न यांना सहसा पडत नाही. हे अशा महनीय लोकांची व्यक्तिपूजा करतील. जमल्यास त्यांना देवत्वही बहाल करतील परंतु स्वतःच्या अभिमानाला किंवा संकोचाला दूर ठेवत उद्योजकीय लोकांचे मोठे नेटवर्क उभे करावे असे यांना वाटत नाही. यांच्या जनुकांमध्ये नेतृत्वाची बीजे तर असतात परंतु ती उद्योगापेक्षा अन्यत्र पेरली जातात. यांना हरभऱ्याच्या झाडावर चढविणारे आसपास बरेच मतलबी असतात. हे आपला मोठेपणा किंवा दिलदारपणा दाखविण्यासाठी स्थानिक राजकारणी, धर्मकारणी, समाजधुरंधर इत्यादींना बराच वेळ, ऊर्जा आणि धनसामग्री देत राहतात. बहुतेक 'व्यापारी व्हाट्सएप ग्रुप्स'वर उद्योजकीय

चर्चेपेक्षा राजकीय व धार्मिक चर्चा हमरीतुमरीने केली जाते. अंधश्रद्धांवर आधारित पोष्टी टाकताना हे थकत नाहीत. श्रद्धा आणि अंधश्रद्धांमध्ये हे फरक करु शकत नाहीत. आपल्याच मुलांच्या तार्किक प्रश्नांची उत्तरे टाळताना हे श्रद्धेची ढाल पुढे करतील. मोठे होण्यासाठी मोठ्या कल्पनांवर साधकबाधक चर्चा करावी लागते. हे चर्चा करतात विशिष्ट व्यक्ती व घटनांवर ज्यांचा व्यावसायिक – उद्योजकीय पराक्रमाशी फारसा संबंध नसतो. व्हाट्सएप युनिव्हर्सिटीच्या बाहेर हे जात नाहीत. यामुळे मोठ्या सत्याचा मोठा आवाका यांना अवगत होत नाही. बहुतेक व्यापारी समाजांमध्ये काही विचारवंत नेते (बहुतांशाने पुरुष) असतात जे समाजबदलाबाबत भरभरून बोलतात पण त्यासाठी वरवरचे उपाय सुचवतात. काही सामाजिक रोग हे मुळांपासून उखडावे लागतात. यांची अशी तयारी काही विशिष्ट कारणांसाठी नसतेच.

जीवनोद्देशांबाबत स्पष्टता येण्यासाठी जीवनाचे सरळ साधे तत्त्वज्ञान जाणून घ्यावे लागते. उत्तर कर्नाटकातील अनेक व्यापारी समाजांना संत बसवण्णांची महती माहीत असते परंतु त्यांच्या अर्थगर्भ वचनांना खोलात जाऊन समजून घेण्याची यांची तयारी नसते. पश्चिम व दक्षिण महाराष्ट्रात तुकोबारायांबद्दल सारेच व्यापारी भक्तिभाव बाळगून असतात परंतु या महान संताने अवडंबरांवर केलेले प्रहार यांच्या अभ्यासाचा, आस्थेचा आणि अनुकरणाचा विषय नसतो. पिढ्यान्पिढ्या अंधश्रद्धा आणि अवडंबरांच्या गर्तेत राहिल्याने ह्यांना नीरक्षीर न्याय करण्याची इच्छा व सवय नसते. कृष्णाला समजून घेताना गोकुळ – मथुरा – द्वारका – इंद्रप्रस्थ – हस्तिनापूर अशी त्याच्या कर्तृत्वाची चढती कमान अभ्यासावी लागते. यासाठी भक्तियोगाला ज्ञानयोग व कर्मयोगाची साथ द्यावी लागते. राधेची भक्ती करताना रुक्मिणीने कृष्णाला दिलेली समर्थ साथही समजावून घ्यावी लागते. शंकराची उपासना करताना त्याच्या गणांचे वैज्ञानिक संशोधन अभ्यासणे गरजेचे असते. जैन तिर्थंकरांनी मांडलेला अनेकांतवाद (विविध मतांचे व पर्यायांचे समांतर सहअस्तित्व) आज २१व्या शतकातील सर्व कार्यक्षेत्रांत खूप उपयोगी ठरतो. परंतु कट्टरपंथीयांच्या वाढत्या अनुत्पादक प्रभावामुळे ही उत्तम विचारसरणी आज अनेक व्यापाऱ्यांकडून विसरली जाते. अनेक शक्यतांचा सारासार विचार करता आल्यास छोट्या परिघातून मोठ्या परिघात जाण्याचे स्थित्यंतर सोपे होते. बहुतांश व्यापारी हे आसक्ती (Attachment) आणि विरक्ती (Detachment) यामधील संतुलन साधण्यात यशस्वी होत नाहीत. यामुळे यशाच्या छोट्या परिघात ते अडकून राहतात. अंधश्रद्धांना जपण्यात बराच वेळ व ऊर्जा वाया गेल्याने हे शास्त्र – विनोद – कला सारख्या मेंदूला चालना देणाऱ्या उपयोगी गोष्टींना प्राधान्य देऊ शकत नाहीत. मेंदूची सर्जनशीलता ही अवडंबरांमुळे मारली जाते, हे यांच्या लक्षात येत नाही.

व्यापारी समाजांनी एकूण समग्र विकासाचे तत्त्वज्ञान समजून घ्यायला हवे. हा एकूण किंवा संपूर्ण विकास व्यक्तिगत आणि सामूहिक जगण्याच्या चार स्तंभावर आधारलेला असतो. हे एक प्रकारचे फ्यूजन असते ज्यात चार गोष्टींचा अंतर्भाव होतो – आर्थिक किंवा भौतिक संपन्नता, बौद्धिक किंवा वैचारिक प्रगल्भता, भावनिक किंवा सामाजिक संवेदनशीलता आणि मानसिक किंवा सांस्कृतिक उत्फुल्लता. या चारही गोष्टींची सांगड घालण्यासाठी विवेक आणि विज्ञान यांचे संतुलित मिश्रण उपयोगात आणावे लागते. व्यापाऱ्यांची नवी पिढी नेमके हेच करु इच्छिते. यासाठी मानसिक स्थैर्याला बिघडवणाऱ्या अवडंबरांना, अंधश्रद्धांना आणि असत्य कथांच्या साखळदंडांना तोडावे लागेल. हे अवघड आहे पण अशक्य नाही. यासाठी आपल्या व्यक्तिमत्वाला चार गुणांकांनी सशक्त बनवावे लागेल.

हे चार गुणांक असे – बुध्यांक (तार्किकता), ऊर्जांक (सौष्ठवता), उद्योजकांक (उद्यमशीलता) आणि सामाजिकांक (संवेदनशीलता). बहुसंख्य व्यापारी समाजांना 'कृष्ण' हा खूप प्रिय असतो. या चारही गुणांकांचे समुचित दर्शन कृष्णाच्या व्यक्तिमत्वात होते. अर्थात यासाठी 'कृष्ण' नीटपणे समजून घ्यायला हवा. कृष्णाने इंद्राची पूजा का बंद करायला लावली, हे नीटपणे लक्षात घ्यायला हवे. जे गुरू विज्ञान आणि विवेक यांची यथोचित सांगड घालू शकत नाहीत त्यांना टाळायला हवे. व्यापारी समाजांचे बहुतेक सदस्य हे चतुर असतात. या चतुराईला 'तार्किकते'ची जोड दिली तर या समाजांना मनाचे उत्तम व्यवस्थापन जमू शकेल. मनाची बैठक एकदा पक्की झाली की 'एकूण विकासा'वर मेंदू सर्व दिशांतून काम करू लागेल. जुन्या पिढीचा दीर्घ अनुभव आणि नव्या पिढीची अमर्याद ऊर्जा यासाठी एकत्रितपणे कार्यरत करावी लागेल!

Copyright © jakhotiya.com
Right to change/reproduce withheld, IPC copyright -ct 1957. The article can be forwarded with author's name for public awareness.
वरील लेख भारतीय प्रताधिकार कायदा १९५७ नुसार फेरफार अथवा नक्कल निषेधित. लेखकाच्या नावानिशी हा लेख विविध समूहांमध्ये पाठविता येईल.

# गणेशोत्सव सजावट स्पर्धा २०२४

आपल्या मराठे प्रतिष्ठानतर्फे सदस्यांसाठी तसेच चित्पावन कपिगोत्री ब्राह्मण असलेल्या मराठे, खांबेटे, चक्रदेव, विद्वांस, जाईल, जोशी आणि तज्जन्य आडनावाच्या व्यक्तिंसाठी **'घरगुती गणेशोत्सव सजावट स्पर्धा'** आयोजित केलेली आहे. आपल्या स्वतःच्या घरातील गणपतींसाठी केलेल्या सजावटीची कमाल दोन छायाचित्रे प्रतिष्ठानकडे पाठवून आपण या स्पर्धेत भाग घेऊ शकता. याबाबतचे नियम व अटी पुढीलप्रमाणे:

- **स्पर्धेसाठी नोंदणी :** स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तिंनी दि. १० सप्टेंबर २०२४ पर्यंत ९२२०६९९९५७ या क्रमांकावर SMS करून आपले नाव व राहण्याचे ठिकाण याची नोंदणी करावी.
- **भाग घेण्यासाठी पात्रता :** 'मराठे परिवार' या facebook group वरील सदस्य, मराठे प्रतिष्ठानचे/हितगुजचे सदस्य, मराठ्यांच्या माहेरवाशिणींच्या कुटुंबातील सदस्य, इतर सर्व कपिगोत्री मराठे कुलबांधव.
- **प्रवेशिका कुठे/कशा पाठवाव्या :** 'मराठे परिवार' या facebook group वर upload किंवा admin@marathepratishthan.org या ई-मेल आयडीवर केवळ '.jpg' format मधील कमाल २ फाईलद्वारे.
- **प्रवेशिका पाठविण्याचा कालावधी :** दि. १० सप्टेंबर २०२४ ते दि. २५ सप्टेंबर २०२४.
- प्रवेशिका म्हणून पाठवलेली छायाचित्रे प्रेषकाच्या घरच्या गणपतीच्या सजावटीची असावीत, बिल्डिंग/सोसायटी किंवा आळीतील किंवा इतर सार्वजनिक ठिकाणच्या गणपतीच्या सजावटीची नव्हेत. माहेरवाशिणी आपल्या माहेरच्या गणपतीच्या सजावटीची छायाचित्रे पाठवू शकतील.
- छायाचित्रे GPS Enabled असावीत. म्हणजे फोटो काढल्याचे ठिकाण कळू शकेल.
- प्राप्त झालेल्या प्रत्येक छायाचित्रास एक क्रमांक (आयडी) देण्यात येईल व तो प्रेषकाला कळवला जाईल. त्यासंबंधी असलेल्या विचारणा (enquiry) त्या क्रमांकाचा दाखला देऊन कराव्या.
- या स्पर्धेच्या बाबतीत अंतिम निर्णय परिक्षकांचा असेल. त्यासंबंधी कोणत्याही प्रकारची तक्रार/वादविवाद होऊ नयेत एवढीच माफक अपेक्षा आहे.

| या स्पर्धेतील यशस्वी स्पर्धकांना देण्यात येणारी पारितोषिके: | | |
|---|---|---|
| **प्रथम पारितोषिक : रु.१००१/-** | **द्वितीय पारितोषिक : रु. ७५१/-** | **तृतीय पारितोषिक : रु. ५०१/-** |
| **२० पेक्षा जास्त प्रवेशिका आल्यास २ उत्तेजनार्थ बक्षिसेही देण्यात येतील.** | | |

**टीप:**

१. मराठे प्रतिष्ठानच्या **'कार्यकारिणी सदस्यांना'** या स्पर्धेत भाग घेता येणार नाही.

२. पारितोषिक विजेत्यांची निवड, **किमान त्रिसदस्यीय** मंडळ करेल, ज्यात फोटोग्राफी/कला/ सजावट क्षेत्रातील जाणकार दोन/तीन सभासद सदस्य तसेच एक बाह्य परीक्षक असतील.

३. या स्पर्धेसंदर्भात काही शंका किंवा सूचना असल्यास कार्यवाह श्री. हेमंत मराठे यांच्याशी संपर्क साधावा.

४. कमीतकमी 7 प्रवेशिका आल्या तरच स्पर्धा घेण्यात येईल, अन्यथा स्पर्धा रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
ई-मेल: hemant.a.marathe@gmail.com, भ्रमणध्वनी: ९२२०६९९९५७

# श्रीमद् भगवद्गीतार्थ मंजिरी

• डॉ. नंदकुमार मराठे

रणांगणात वीरश्री निर्माण व्हावी म्हणून स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व विसरून केवळ मारण्याच्या वा जिंकण्याच्या इच्छेने सैन्य प्रेरित व्हावे म्हणून विविध प्रकारचे उपाय योजले जातात. लढायला सुरुवात करण्यापूर्वी विरश्रीयुक्त भाषणे करून, मंगलतिलक लावून व आरती करून, त्याचप्रमाणे विविध वाद्यांचा घोष करून सैनिकांना युद्ध करण्यास उद्युक्त केले जाते. भेरी, नगारा, शंख, तुतारी, शिंगे अशा प्रकारच्या वाद्यांचा उपयोग प्रामुख्याने प्राचीन काळी केला जात असे.

अशा प्रकारच्या वाद्य वादनाचा दुहेरी उपयोग होत असे. ज्याप्रमाणे वाद्यांच्या नादाने आणि तलवारीच्या खणखणाटाने वीरश्री निर्माण होत असे, त्याचप्रमाणे ह्या ध्वनीचा परिणाम होऊन शत्रुपक्षाचे मनात थरथराट निर्माण होण्याचीही शक्यता असते. किंबहुना हा घोष फार मोठा झाला तर शत्रुपक्षाच्या हृदयात नक्कीच धडकी भरून ते सैन्य हतोत्साह व गर्भगळित होते. भगवद्गीता या संदर्भात स्पष्टच म्हणते, 'स घोषो धार्तराष्ट्राणां हृदयानि व्यदारयत्!' धृतराष्ट्र पुत्रांची हृदये त्या घोषाने विदीर्ण झाली. भीमाची गर्जना आणि मारुतीचा भुभुःकार ऐकून कौरव सैन्य गर्भगळित झाले, असे महाभारतकार व्यासांनी म्हटले आहे. पांडवांचे सैन्य आणि कौरवांचे सैन्य समोरासमोर उभे ठाकल्यानंतर उभय सैन्यातील वीरांनी युद्धवाद्यांचा घोष केला. त्यामध्ये विविध वीरांनी गाजविलेल्या विविध शंखांच्या उल्लेख गीतेने केला आहे. या शंखांच्या भाग्याचे वर्णन करताना सुभाषितकार म्हणतात, ''पिता रत्नाकरो यस्य लक्ष्मीर्यस्य सहोदराः। सशंखो भिक्षाटनं कुर्यात सर्वे भाग्यानुसारितः।।'' ज्याचा पिता रत्नाकर आहे आणि बहीण लक्ष्मी आहे अशा शंखांच्या नशिबी मात्र दारोदार भटकण्याचे भाग्य आहे, असा हा शंख!

शंख माहात्म्य असे सांगते की, विशिष्ट प्रकारच्या शंखांचा आवाज माणसाला आत्मविश्वास, मानसिक स्थिरता आणि दीर्घायुष्य प्रदान करतो. शरीरातील सर्व अमंगल भाव काढून टाकून मांगलिक भाव निर्माण करण्याचे सामर्थ्य शंखामध्ये असून देवतार्चनामध्ये शंखोदकस्नानाचे महत्त्व वर्णन करून सांगितले आहे. वास्तविक पहाता शंख हा एक जलचर प्राणी असून त्याच्या पाठीवरचे टणक कवच म्हणजेच हा वाजविला जाणारा शंख होय. या शंखाचाही उजवा डावा असे दोन प्रकार असून त्यांचा आकार, रंग, रूपही वेगवेगळे असते. या प्रत्येक शंखाचा परिणामही वेगवेगळा आहे. महाभारतकारांनी पांडवांकडील वीरांनी वाजविलेल्या शंखांचा सविस्तर उल्लेख केला आहे. 'पाञ्चजन्यो हृषिकेशः देवदत्तो धनंजयः।।'

श्रीकृष्णाने पांञ्चजन्य नांवाचा शंख वाजवला तर धनंजयाने – अर्जुनाने देवदत्त शंख वाजविला. पांडवांच्या शंखध्वनीमधून त्यांच्या यशाचे संकेत दुर्योधन आणि त्याच्या सैन्याला मिळाल्यामुळे दुर्योधनाचे व कौरवांचे हृदय विदीर्ण झाले. भक्कम आत्मविश्वास प्रतिकुलतेवर मात करण्याचे सामर्थ्य देतो. सर्व प्रकारच्या प्रतिकूल परिस्थितीवर मात करूनच पांडव या युद्धासाठी सज्ज झाले होते.

दुर्योधनादी चांडाळ चौकडीच्या विविध प्रकारच्या खेळी उध्वस्त करीत पांडवांची विजयाकडे वाटचाल चालू होती आणि आता तर युद्धाच्या अंतिम क्षणी दुर्योधनाचे सेनापती आणि प्रमुख योद्धे भीष्म, द्रोण, कृपाचार्य इत्यादी वीर पांडवांचे पक्षपाती परंतु दुर्योधनाचे बाजुने युद्धास उभे ठाकले. त्यांना डावलून दुर्योधन युद्ध करू शकत नव्हता. आणि त्यांना बरोबर घेऊन युद्ध जिंकण्याची कोणतीही आशा दुर्योधनाला नव्हती. तो पूर्णपणे कोंडीत सापडला होता.

धरले तर चावते आणि सोडले तर पळते अशा पद्धतीने हतबल झालेले, परिस्थितीच्या गाळात रुतलेले दुर्योधन आणि त्याचे सैन्य विजयाच्या अपेक्षेने, अगतिकतेने युद्ध लढण्यास सिद्ध झालेले होते. भीष्म, द्रोणादिकांच्या पक्षपाती वागणुकीबद्दल त्याला त्यांची निर्भर्त्सनाही करता येत नव्हती किंवा त्यांच्याकडून पांडवांच्या नाशाची अपेक्षाही करता येत नव्हती. आपले मरण, आपला सर्वनाश उघड्या डोळ्यांनी, थिजलेल्या मनाने पाहणे एवढेच केवळ त्यांच्या हातात होते.

याउलट प्रत्येक पावलाला विजयश्री गळ्यात माळ घालते आहे, जे म्हणू ते करण्याचे सामर्थ्य आपणाजवळ आहे असा दुर्दम्य आशावाद आणि सर्व प्रकारचे आघात सहन करून आपण ते मिळवू शकतो असा आत्मविश्वास पांडवांजवळ आहे. म्हणूनच पांडवांच्या प्रत्येक हालचालीने कौरवांच्या हृदयात धडकी भरत होती.

युद्ध जिंकायचे असेल तर सेनापतीला आणखी एका गोष्टीचा विचार करावा लागतो. तो म्हणजे आपल्याकडच्या प्रमुख वीरांचा, त्यांच्या मानसिकतेचा; भीष्म, द्रोण, कृप,

अश्वत्थामा, शकुनी, कर्ण, शल्य असे अनेक वीर दुर्योधनाच्या पक्षात आहेत. परंतु भीष्म, द्रोण, कृप, शल्य हे पांडवांचे पक्षपाती असून दुर्योधनाची खरी मदार ज्या कर्णावर आहे तो कर्ण शापग्रस्त आहे. ऐन मोक्याच्या क्षणी कर्ण दुर्योधनासाठी काहीही करू शकणार नाही. कारण त्याच्या अस्त्रांचे त्याला स्मरण होणार नाही, त्याच्या रथाचे चाक ऐनवेळी भूमी गिळेल अशा परशुरामांच्या शापांनी निरुपयोगी झालेला कर्ण आपल्या फारसा उपयोगाचा नाही याची जाणीव दुर्योधनाला आहे.

युद्धापेक्षा फाशांवर अधिक प्रेम करणारा शकुनी आणि शीघ्रकोपी, चंचल व अहंकारी अश्वत्थामा हेही युद्ध जिंकून देण्यास असमर्थ आहेत हे दुर्योधन जाणतो. म्हणूनच 'मदर्थे त्यक्तजीविताः' म्हणून कोण कोण आहेत हे पाहण्याचा प्रयत्न करणाऱ्या दुर्योधनाला काळजीने ग्रासले आहे. या युद्धामध्ये पांडवांच्या बाजूने लढणारे प्रमुख अठरा वीर आहेत त्यांचा उल्लेख गीतेने केला आहे.

एकंदरीतच व्यास महर्षिंना अठरा या आकड्याचे मोठे आकर्षण आहे. त्यांनी अठरा महापुराणे व अठरा उपपुराणे रचली. महाभारताची पर्वे अठरा असून या महाभारतामध्ये अठरा अध्यायांची गीता आहे. महाभारत युद्धाचा काळ अठरा दिवसांचा असून या युद्धामध्ये अठरा अक्षौहिणी सैन्य एकत्र येऊन लढले आहे. गीतेने पांडवांकडच्या अठरा महारथींचा उल्लेख केला आहे. या अठरा संख्येमध्ये नेमके कोणते रहस्य दडले आहे हे शोधून काढणे गरजेचे आहे. या युद्धासाठी भीष्मांनी पतत्रि नावाचा व्यूह रचला होता त्याला उत्तर म्हणून पांडवांनी वज्र नावाच्या व्यूहाची रचना केली होती.

युद्धामध्ये व्यूहरचनेला खूपच महत्त्व असते. व्यूहभेद करता आला तर जिंकण्याची आशा धरता येते. अन्यथा मोठ्या प्रमाणावर जीवित हानी व अपयश पदरी पडते. पतत्रि प्रकारची व्यूहरचना ही पक्षासारखी असते. ज्याप्रमाणे कोणत्याही बाजूने, कोणत्याही बाजूला मान वळवून पक्षी पाहू शकतो आणि त्याच्या दिशेने झपकन झडप मारू शकतो, त्याप्रमाणे भीष्मांनी आपल्या सैन्याची रचना केली होती. त्यामुळे पांडव सैन्यावर कोणत्याही बाजूने हल्ला करणे व त्यांचा कोणत्याही बाजूवर होणारा हल्ला गतिमान हालचालीने मोडून काढणे भीष्म सैन्याला सहज शक्य होणार होते.

याला उत्तर म्हणून पांडवांनी युधिष्ठिराच्या आज्ञेप्रमाणे वज्र नावाची सुईच्या आकाराची व्यूह रचना केली होती. या रचनेमध्ये सैन्य हे सुईसारखे सरळ रेषेत उभे करून नाभी स्थानी म्हणजे अत्यंत महत्त्वाच्या ठिकाणी, मोक्याच्या ठिकाणी वीराची योजना असते. कौरव सैन्याने पक्षाच्या डोक्याच्या ठिकाणी भीष्मांची योजना केली होती आणि भीष्मांचे रक्षण करण्याची आज्ञा दुर्योधनाने कौरवांना दिली होती. वास्तविक पाहता इच्छामरणी असणाऱ्या, प्रत्यक्ष परशुरामांचा युद्धामध्ये पराभव करणाऱ्या, गंगामातेकडून शस्त्रास्त्रे प्राप्त केलेल्या भीष्मांचे रक्षण करण्याची गरज नव्हती. परंतु शिखंडी समोर, स्त्रीसमोर मी युद्ध करणार नाही. शस्त्र धरणार नाही अशी भीष्मांची प्रतिज्ञा असल्यामुळे पांडवांकडील शिखंडीपासून भीष्मांना धोका होता. यासाठीच त्यांचे रक्षण करण्याची आज्ञा दुर्योधनाने आपल्या सैन्याला दिलेली होती.

पांडवांच्या सैन्याच्या मर्मस्थानी भीमाची योजना करण्यात आली होती. त्यामुळे भीमाला दूर करून पांडव सैन्याला परास्त करणे कौरव सैन्याला सोपे नव्हते. अशा रितीने सैन्याची योग्य ती रचना करून परस्परांना पराभूत करण्याच्या ईर्ष्येने उभ्या ठाकलेल्या उभय सैन्यामध्ये अर्जुनाचा रथ श्रीकृष्णांनी उभा केला होता. अशावेळी अर्जुनाच्या मनात निर्माण झाला होता.❖







# श्री. शेखर खांबेटे (पृ.६७६)

**• श्री. भाऊ मराठे तथा कै. श्री. सदानंद विष्णु मराठे (पृ. ५०७)**

**शा**स्त्रीय संगीताच्या मैफलीचं सुरुवातीचं गंभीर वातावरण : गायक बैठकीवर विराजमान झालेले आहेत, हार्मोनियमच्या साथीदाराने तबला सुरात लावण्यासाठी हार्मोनियमवर सूर दिलेला आहे. तबलजी प्रथम तबला प्रेमाने कुरवाळतो; हातोडी



उचलून तबला फिरवत फिरवत तालात ठाकठोक करून तबल्याची मनधरणी करतो. डग्गयावर हातोडीची हलके ठकठक होते आणि वाद्य मनासारखं, सुरात लागलं की त्या तबलजीच्या चेहऱ्यावर प्रसन्न हास्य फुलतं. ते हास्य म्हणजे पुढच्या मैफलीच्या रंगतदार साथीची नांदी असते – तो तबलजी म्हणजे शेखर खांबेटे. गप्पांच्या ओघात शेखर खांबेटे सांगत होते – माझे तबल्याचे गुरू म्हणजे श्रीधर पाध्ये. मी ४थ्या इयत्तेत असताना प्रथम लोकांसमोर तबला वाजवला. ते एक असं वय असतं की मंचभय वगैरे काही नसतं. त्याचा पुढे मला फार फायदा झाला. आजही मला मंचभय वगैरे काही नाही.

**प्रश्न** : तबला हे फक्त साथीचं वाद्य आहे की एकल (Solo) वादनही करता येतं?

**शेखर** : माझ्या मते दोन्ही. तबला हे तालवाद्य. ताल हा गाण्याचा प्राण असतो. सूर आणि ताल सुंदररित्या एकत्र आल्यावर श्रोता डोलायला पाहिजे. तबलजी जर साथीदाराच्या भुमिकेत असेल तर ठेका इतका डौलदार धरावा लागतो की गायकाला त्या ठेक्यावर आपण गात राहिलं पाहिजे असं वाटलं पाहिजे. एकल (Solo) वादनाच्या संदर्भात बोलायचं झालं तर शास्त्रीय परिभाषेत पेशकश–कायदा–रेला–परण–चक्रधार हे सगळं लयीच्या अंगाने सुंदर वाजवता येतं. एकल वादनात कुठल्याही वेड्यावाकड्या कसरती न करता तबला तुम्हाला तास–दीडतास रिझवू शकतो. शास्त्राच्या सगळ्या कसोट्या पाळून झाकीर हुसेनने केलेलं एकल तबलावादन मी ऐकलं आहे. म्हणून तबला हे साथीचं आणि एकत्र वादनाचं वाद्य आहे.

**प्रश्न** : तुम्ही साथीला असलेल्या खूप बैठकी मी ऐकल्या आहेत. गाण्याची तबल्यातून जी पहिली उठावाज असते ती तुम्ही फार छान करता. याचा अभ्यास कसा केला?

**शेखर** : माझा Classical Base उत्तम तयार आहे. मी पं. नारायणराव बोडस, शरद जांभेकर, वीणा सहस्त्रबुद्धे, श्रुती सडोलीकर अशा वेगवेगळ्या गायकांची/गायिकांची साथ केली आहे. आपला स्वतःचा Classical Base तयार असला की वेगवेगळ्या घराण्यांची खासियत लक्षात घेऊन वाजवता येतं. शिवाय रियाज असतोच. तो कुठल्या कलावंताला चुकला आहे? (पुलंच्या भाषेत बोलायचं झालं तर रियाज करायचा ज्याला कंटाळा आला त्यानं गाणं/बजावणं सोडून राजकारणात शिरावं. तिथे बेसूर लोकांची फार आवश्यकता असते. सुराला सूर मिळवणं याला राजकारणात काही अर्थ नसतो. बेसूर लावता आला पाहिजे. –मी)

पं. राम मराठे ह्यांना डिचोलीच्या कार्यक्रमात प्रथम साथ केली. तो माझ्या आयुष्यातला एक फार आनंदाचा क्षण आहे. पं. राम मराठ्यांची साथ करायची म्हणजे येऱ्या गबाळ्याचं काम नाही. दाण दाण जाणारं गाणं होतं ते. क्षणाची उसंत मिळत नसे. माझ्या वडिलांच्या मते 'पं. राम मराठे' हा एकच गायक होता. मी घरी आल्यावर वडिलांच्या फोटो समोर उभा राहून म्हणालो, "बाबा, मी पं. राम मराठ्यांना साथ करून आलो आहे. आता तुम्ही मला तबलजी मानाल!"

**प्रश्न** : तुम्ही संगीत नाटकांनासुद्धा साथ केली आहे.

**शेखर** : मी संगीत नाटकाच्या प्रेमापोटी साथ करतो. संगीत नाटक टिकलं पाहिजे हे माझं प्रामाणिक मत आहे. अहो भास्करबुवा बखले, रामकृष्णबुवा वझे, मास्तर कृष्णराव अशा दिग्गजांनी बसवलेली ती गाणी आहेत. नाटकातली बरीचशी गाणी ही शास्त्रीय संगीतावर आधारलेली आहेत. इथेसुद्धा माझा Classical Base मला उपयोगी पडला. पुन्हा

नाटक चालू असताना तबल्याची साथ करणं हे एक वेगळं तंत्र आहे. कारण नाटकात मायक्रोफोन तबल्यापासून लांब असतो. त्यामुळे तबल्यावर थापच अशी पडली पाहिजे की अभिनेत्याला/अभिनेत्रीला आणि प्रेक्षकांना सगळ्यांनाच उत्साह वाटला पाहिजे. गाण्याच्या बैठकीत मायक्रोफोन तबल्याजवळ असल्यामुळे त्या तंत्राने वाजवायला लागतो. आजच्या आधुनिक तंत्राचा तबलजीनेसुद्धा अभ्यास करायला पाहिजे.

**प्रश्न** : नवीन अशा कुठल्या संगीत नाटकाची साथ केलीत?

**शेखर** : तो योग आला पं. जितेंद्र अभिषेकींनी स्वरबद्ध केलेल्या 'धाडिला राम तिने का वनी' या नाटकाच्या निमित्ताने. त्यावेळेस मुंबई मराठी साहित्य संघाच्या 'सहापुत्रलिका' या नाटकात दिलीप कोल्हटकरांच्या दिग्दर्शनाखाली अभिनय करत होतो. (त्या नाटकात मला अभिनयाचं रौप्यपदक मिळालं) या दोन्ही नाटकांची तालीम साहित्य संघातच चालायची. आमच्या नाटकाची तालीम संपल्यावर मला वेळ असायचा म्हणून 'धाडिला राम तिने का वनी' या नाटकाच्या गाण्यांची तालीम ऐकायला बसायचो. एक दिवस त्या नाटकासाठी मुक्रर केलेला तबलजी आला नव्हता. मी खाली उभा असलेला पाहून पं. नारायणराव बोडस मला वर घेऊन गेले. मुक्रर केलेला तबलजी गैरहजर राहिल्यामुळे त्यांची अडचण झाली होती. म्हणून मी तालमीत साथ केली होती. पण पं. जितेंद्र अभिषेकींना मी केलेली साथ आवडली असावी. त्यामुळे मी ह्या नाटकाच्या पहिल्या प्रयोगाची साथ केली. 'हयवदन' नाटकात पात्रांच्या हालचाली नुसार मी 'रिदम' बसवला होता. त्यानंतर मी 'कधी तरी कोठे तरी', 'कांते फार तुला मजसाठी' ह्या नाटकांतही तबल्याची साथ केली.

**प्रश्न** : National Center for Performing Arts या मान्यवर संस्थेशी कसा संबंध आला?

**शेखर** : १९७९ साली 'संगीत शाकुंतल' या विजया मेहतांनी दिग्दर्शित केलेल्या संगीत नाटकाने NCPAचं उद्घाटन झालं. नंतर पु.ल. देशपांडे आले, पाठोपाठ पं. अशोक रानडे आले. ह्या दोघांनी NCPA मध्ये अतिशय उत्कृष्ट कार्यक्रम सादर केले. खरं म्हटलं तर ह्या दोघांनी मराठी माणसांना NCPA मध्ये कार्यक्रम ऐकायला यायची सवय लावली. माझं तबलावादन पुलंनी पुण्याला ऐकलं होतं आणि माझं तबलावादन त्यांना आवडत आहे हे मला त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होतं. पुढे पुलं आणि पं. अशोक रानडे यांना NCPA त सादर केलेल्या पहिल्याच कार्यक्रमात मी तबलजी होतो. मग मात्र ह्या दोघांनी मला सतत तबलजी म्हणून निवडलं. पण NCPA मुळे I was exposed to bigger audience आणि पुल – अशोक रानडे या दोघांमुळे एखाद्या विषयाचा परिपूर्ण अभ्यास कसा करायचा याची दृष्टी मिळाली.

**प्रश्न** : आठवणीत राहतील अशा मैफिली किती?

**शेखर** : बऱ्याच आहेत. अलिबागला फैय्याजच्या कार्यक्रमात साथीला बसलो होतो. फैय्याझ 'लागी करेजवा कटार' तुफान गात होत्या. मी सुद्धा सुंदर साथ करत होतो वेगवेगळ्या लग्ग्या वाजवत होतो. ठुमरी संपल्यावर एक रसिक माझ्या हातात ५ रुपये देऊन म्हणाला, ''क्या लग्गी बजाया – वा!'' हा रसिक मला परत भेटला नाही.


आमचा 'देवगाणी' हा कार्यक्रम दिल्लीला होता. पं. रविशंकर प्रमुख पाहुणे होते. प्रकृती अस्वास्थ्यामुळे फार वेळ बसणार नव्हते. पण तेही रंगले. कार्यक्रमात कसा कुणास ठाऊक मी पाच मात्रांचा एक ताल वाजवला. तो ऐकल्याबरोबर पं. रवी शंकर उठून पुढे आले आणि मला मनापासून दाद दिली. अरे, पं. रविशंकरांसारख्या दिग्गज कलावंताकडून मला दाद मिळाली यापरतं दुसरं भाग्य कोणतं? अच्छा!

– शेखर खांबेटे यांनी खूप अभ्यास करून बसवलेल्या चक्रसंगीत : कृष्ण गाथा : विठ्ठल गीती गावा : भावगीताच्या पाऊलखुणा आणि रंग लावणीचे या त्यांच्या पाच कार्यक्रमांची सविस्तर माहिती 'हितगूज'च्या जूनच्या अंकात दिलीच आहे.

– शेखर खांबेटे कलावंताची मैफिल सुंदर व्हावी ह्या भावनेने साथीला बसतात. ते नुसते अनुचर नाहीत तर कलावंताचे सहचर आहेत. तरबेज गायक असेल तर त्याला आणखी पूरक काय वाजवायचं आणि नवीन गायक असेल तर त्याला कसं सांभाळून घ्यायचं ह्या सगळ्या खुब्या त्यांना ठाऊक आहेत. शेखर खांबेटे कधी ट्रबलजी झाले नाहीत ते अप्रतिम तबलजीच राहिले. त्यांच्या पुढच्या सांगीतिक वाटचालीला मराठे प्रतिष्ठानतर्फे हार्दिक शुभेच्छा.

❖

## सहवेदना



ठाणे येथील मराठे इन्फोटेक प्रा. लि. या कंपनीचे सर्वेसर्वा आणि ठाण्याचे पहिले नगराध्यक्ष स्व. योगिराज तथा वसंतराव मराठे यांचे सुपुत्र श्री. विनय मराठे यांना अकस्मात देवाज्ञा झाली. मराठे प्रतिष्ठानला त्यांनी बहुमोल मदत केली होती. मृत्युसमयी ते अवघे साठीच्या आसपास होते. त्यांना मराठे प्रतिष्ठानच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली. ईश्वर मृतात्म्यास सद्गती देवो.

# कहाणी नरेंद्र महाराजांची
## (एक माणूस - एक दिवस)

• ह. मो. मराठे, अमरावती

**मी** विचारतो, ''तुम्ही बारा वर्षे तपश्चर्या केली असं मी एके ठिकाणी वाचलं होतं किंवा ऐकलं होतं, पण...?''

''तपश्चर्या वगैरे काही नाही.'' महाराज पटकन सांगून टाकतात.

मी विचारतो, ''शिक्षण किती झालं तुमचं?''

महाराज : ''दहावी''

मी : ''पण नंतर वाचनाने...''

महाराज : ''वाचनही फारसं नाही माझं.''

विषय पुन्हा गेल्या वर्षीच्या आंदोलनाकडे आणि वृत्तपत्रांतून आलेल्या टीकेकडेच वळतो. महााराजांचा स्वर तसा तक्रारीचा आणि नाराजीचाच असतो. महाराज म्हणत असतात, ''टीका करण्यामागे वर्तमानपत्रांचेही हितसंबंध होते. वर्तमानपत्रांनी धंदा केला... मी मुलाखती देणं वगैरे बंद केलं. मी म्हणालो, तुम्ही सत्य सांगत नाही. मी ऑडिट दाखवलं. म्हणालो, मी ग्रामसेवक होतो. संस्था कशी चालवायची हे मला माहीत आहे. काही पत्रकारांनी चुकीचं छापलं. इकडले ग्रामस्थ चिडले. त्यांनी संघर्ष समिती स्थापन केली. पत्रकारांना त्यांनी मारहाण केली. पत्रकारांनी पोलिस कंप्लेंट्स केल्या. ग्रामस्थांना राग आला. (मठामुळे) अनेकांचे धंदे-व्यवसाय वाढले आहेत, ते चिडले... पत्रकारांनी सूडानं लिहिलं. .... वर्तमानपत्राच्या संपादकांनी आमची बाजू घेण्यासाठी पैशांची मागणी केली. मी ती मानली नाही. काहींनी टीकेचा रोख बदलून प्रशंसा सुरू केली. त्यांचा खप वाढला. पत्रकारांनी छापलं की मला नोकरीतून सस्पेंड केलं होतं... मी राजीनामा दिला होता. माझा राजीनामा स्वीकारून नोकरीतून मुक्त केल्याची ऑर्डर आहे माझ्याकडे.''

महाराज कोणाला तरी म्हणतात, ''जा रे. त्या पत्राची झेरॉक्स घेऊन ये.''

आता भक्ती हा विषय निघतो. महाराज सांगतात : भक्ती म्हणजे... तासन्‌तास बसलं पाहिजे असं नाही. ध्यानधारणा करावी... वेळ मिळेल तेव्हा... ध्यानधारणा ही मनाची ताकद वाढवण्यासाठी असते. मनाची ताकद वाढवण्यासाठी इतरांना ध्यानधारणा सांगावी लागते... तीर्थयात्रा - ती निरर्थक असते हे ज्ञानेश्वरांनाही माहीत होतं, पण त्यांनी ती लोकांसाठी



केली.भक्तिमार्गाबद्दल अनेकांच्या मनात गैरसमज आहेत... मी चमत्कार करतो असा माझा दावा नाही. मला अंत:स्फूर्तीनं जे समजलं ते सांगतो. गुण येणाऱ्यांनी काय ते ठरवावं...

तिथून विषय जातो अध्यात्म आणि विज्ञान याकडे. महाराज पुराणं, महाभारत इथली उदाहरणं देतात. महाभारतात वर्णिलेले अनेक जन्म हे टेस्टट्यूब बेबीचं विज्ञानच असल्याचं महाराज म्हणतात. रामायणातील पुष्पक विमान हेही त्या काळचं विज्ञानच, असं म्हणतात.

पत्राची झेरॉक्स येते. महाराज एक एक प्रत आम्हाला देतात. मी वाचतो. रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या त्यावेळच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या सहीचं ते पत्र असतं. एक. बी. सुर्वे, ग्रामसेवक, पंचायत समिती, देवरुख यांनी १४-२-९२ पासून दिलेला राजीनामा स्वीकृत केल्याचा उल्लेख त्यात असतो. मात्र हे पत्र २-११-९२ चं असतं.

कदम विचारतात की, महाराजांना विरोध कधीपासून सुरू झाला?

महाराज सांगतात, ''आम्ही हुंडाविरोधी मोहीम सुरू केली तेव्हापासून कोल्हापूर-सांगली भागातून विरोध सुरू झाला.''

महाराज आता आपला 'आध्यात्मिक' प्रवास कसा झाला ते सांगू लागतात. म्हणतात, ''शेगावचे गजानन महाराज हे माझं उपास्य दैवत. गजानन महाराज मला आजही संदेश देतात. त्यांनी आपणाला काडसिद्धेश्वर महाराजांकडे जाण्याचा संदेश दिला. पण त्यांनी मला आधी आपला शिष्य मानलं नाही. हा माझा शिष्य नाही असं जाहीर केलं. नंतर त्यामागचा हेतू गजानन महाराजांनी सांगितला. म्हणाले की, तू स्वतंत्रपणे उभं राहावंस म्हणूनच त्यांनी तसं म्हटलं... काडसिद्धेश्वर महाराज स्वत: नाणीजला येऊन गेले... साधुसंतांनी रंजल्यागांजलेल्यांना जवळ केलं पाहिजे. नाहीतर अंधश्रद्धा बोकाळेल. मला जे समजत नाही ते मी सांगत नाही. उदाहरणार्थ, पाणी कोठे लागेल? मी सांगतो, मला त्यातलं समजत नाही. तुम्ही भूगर्भशास्त्रज्ञांकडे जा... माझ्यात अतिंद्रियशक्ती आहे, असं मला कधीकधी जाणवतं. मला दिसतं. बाईच्या पोटात मुलगा आहे की मुलगी हे मला दिसू शकतं... एखाद्याच्या मेंदूत गाठ असली तर ती मला दिसू शकते...''

मी विचारलं, ''असं म्हणतात की ज्यांना अतिंद्रियशक्ती प्राप्त झालेली असते, त्यांना भविष्यकाळातल्या गोष्टी दिसतात. तुम्हाला तसं काही जाणवतं का?''

महाराज सांगतात, ''जाणवतात. आगामी महायुद्ध इ. स. २००६ ते २०१० या काळात होईल. मी हे पत्रकारांना म्हणालो तर त्यांनी छापलं की १९९९ मध्ये महायुद्ध होणार असं महाराज म्हणतात... त्या महायुद्धात मोठी प्राणहानी होईल. त्यनंतर सत्ययुग अवतरेल. संतांना त्रास दिला जातो. ती सहनशक्तीची परीक्षा असते... शरीराचा भोगवटा शरीराला भोगावाच लागतो. माझ्यावर टीका होते. मी असा विचार करतो की मी कुटुंबियांसाठी तर ते करत नाहीये ना? दारू पीत नाहीये ना? होऊ दे टीका...''

सव्वातीन होऊन गेले होते.

कारवारहून महाराजांच्या दर्शनासाठी काही मंडळी आली आहेत, असा निरोप येतो. ते ऐकून कदम उठतात. पुन्हा येईन, असं म्हणत निरोप घेऊन जातात. कारवारहून काही मंडळी (बहुधा स्पेशल गाडी करून) आलेली असतात. सात-आठ जण असतात. ते आत येऊ लागतात. महाराज उठून थोडं पुढे येऊन उभे राहतात. एकेक जण महाराजांच्या पायावर डोकं ठेवून नमस्कार करून जातो. तरुण, मुली, स्त्रिया, प्रौढपुरुष. चांगली सुशिक्षित, सुस्थितीतली वाटणारी मंडळी.

ती मंडळी जातात. महाराज पुन्हा खुर्चीत बसतात. बाहेर उभ्या असलेल्या एकाला बोलतात. मला म्हणतात, ''याला विचारा याची हकीगत.''

तो (वय सुमारे ४० वर्ष, पँट-शर्ट, चेहऱ्यावर थोडा घाबरलेला भाव) सांगू लागतो. त्याच्या सांगण्याचा आशय असा की, तो अरुण गवळी टोळीतील एक गुंड असतो. एन्काउंटरमध्येच त्याचं नाव धरलेलं असतं. तो पोलिसांकडून ठार मारला जाणार हे ठरलेलं असतं. पण तो महाराजांना शरण येतो. त्याचं नाव 'त्या' यादीतून रद्द होतं. महाराज त्याला वाचवतात. तेव्हापासून तो इथंच सेवा करून असतो.

महाराज म्हणतात, ''मी त्याला इथं आल्यागेल्याचं स्वागत करण्याचं काम दिलं आहे.''

थोड्या इकडल्या तिकडल्या गप्पा होतात. महाराज चहा आणायला सांगतात. चहा येतो. मलाही घ्यायला सांगतात. म्हणतात, ''आज गुरुवार. आमचा उपास. आम्ही फारसा चहाही घेत नाही. पण आज इच्छा होतेय. घ्या आमचा चहा खूप गोड असतो. तुमच्यासाठी वेगळा सांगू का?''

''नको.'' मी चहा घेत म्हणालो, ''तुमचा स्वभाव विनोदी आहे. त्याचा फायदा घेऊन म्हणतो की, मला एकाच वेळी दोन पेयं अनुभवता येतात. चहा आणि बासुंदी!''

महाराज हसतात आणि चहा संपवून उठतात. बाहेर येतात.

बाहेर येऊन आमच्या थोड्या गप्पा होतात. तोच भक्तगण दर्शनार्थ पुढे सरसावतात.

एक पुरुष सामोरा येत नमस्कार करून सांगतो, ''पूर्वी भेटायला आलो होतो.''

''हो.''

''तीन बायका केल्या.'' तो सांगतो.

''बाप रे!'' महाराज उद्‌गारतात.

''तरी मूल होत नाय.'' तो सांगतो.

महाराज विचार करीत थांबतात. मग सांगतात, ''उपयोग नाही. तुझ्यात शुक्रजंतूंचं प्रमाण कमी आहे. टेस्टट्यूबचं जमतं का बघा. डॉक्टरकडे जा.''

तो मागं सरकतो. दुसरी तरुण बाई पुढे होते. म्हणते, ''एक मूल झालं आन् पाळी गेली.''

विचार करीत महाराज म्हणतात, ''डॉक्टरकडे जा. पाळी चालू झाली तर मूल होईल, नाहीतर नाही.''

एक तरुणी पुढं होते. चांगली कॉलेजविद्यार्थिनी वाटणारी. तिची तक्रार असते की, घरच्यांनी महाराजांचा फोटो बाळगायला किंवा त्यांच्याबद्दल चर्चा करायला बंदी केली आहे.


महाराज तिला सांगतात, ''फोटो नसेना. नुसती भक्ती कर.'' आणि मला म्हणतात की, ''मागल्या टीकेपासून घरच्यांनी तिला विरोध चालवला आहे. सत्संग मंडळातही जायला परवानगी नाही.''

आणखीही कोणी कोणी दर्शनासाठी येऊन जातं.

# डॉक्टर आणि रुग्ण यांच्या माध्यमातून वाचकांशी साधलेला संवाद

• डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे (पृ. १२०), मुंबई भ्रमणध्वनी : ९८२०२३२०८२/८४३३६७४८१७

काही पुस्तके अशी असतात की, ती एकदा का हातात आली की वाचल्याशिवाय खाली ठेववत नाहीत आणि अशा पुस्तकांमध्ये शोभा बोंद्रे यांच्या 'नाते जन्माचे' या पुस्तकाचा समावेश होईल.




प्रथितयश, नामवंत डॉक्टरांच्या मुलाखती या पुस्तकात आल्या आहेत. डेंटिस्ट, मानसोपचार तज्ज्ञ, बालरोग तज्ज्ञ, स्त्रीरोग तज्ज्ञ, ॲक्युपंक्चरिस्ट, फॅमिली डॉक्टर, आनुवंशिक रोगनिदान तज्ज्ञ, नाक-कान-घसा तज्ज्ञ, अस्थिरोग तज्ज्ञ, सर्जन, न्यायवैद्यक शास्त्रज्ञ, सेक्सॉलॉजिस्ट (कामविज्ञान तज्ज्ञ), प्लॅस्टिक सर्जन स्क्रीन स्पेशालिस्ट, लठ्ठपणाशी लढणारे डॉक्टर, नेत्ररोग तज्ज्ञ अशांचा मुलाखतींचा समावेश असलेले हे 'नाते जन्माचे' पुस्तक आहे.

केवळ ठोकळेबाज पद्धतीने मुलाखत घेणे असे स्वरूप या मुलाखतींचे नाही. प्रश्न आणि उत्तर असा जो ठरीव साचा मुलाखती घेताना असतो तो नाही. या पुस्तकातील मुलाखती संवादांतून रंगतदार आणि रंजक होत जातात, प्रकट होत जातात. मुलाखत घेणे ही एक कला आहे आणि ती लेखिकेला उत्तम साधली आहे. या मुलाखती म्हणजे एक एक कथा आहेत. कहाण्या आहेत. चित्तथरारक कथेसारखे यातील अनुभव आहेत. यातील पात्रे म्हणजे एकेक कथांचा विषय होऊ शकतील अशी आहेत.

या पुस्तकात प्रत्यक्ष घडलेल्या हकीकती आहेत, प्रत्यक्ष घडलेल्या घटना आहेत, खरेखुरे प्रसंग आहेत. काल्पनिक काहीही नाही, त्यामुळे या अनुभवांना एक वेगळेच परिमाण लाभते. यातील अनुभव हे जिवंत आहेत.

शास्त्राला खोटं ठरविणाऱ्या आणि डॉक्टरलाही बुचकळ्यात पाडणाऱ्या विलक्षण केसेस पाहून तसेच नियतीनं शास्त्राला खोटं पाडलं अशा अपवादात्मक केसेस पाहून मन थक्क होते. या पुस्तकात विलक्षण घटना आहेत, शरीरात दिसून येणारे निसर्गाचे अद्भुत चमत्कार आहेत. डोळ्यांत पाणी आणणारे पेशंटस्‌चे अनुभव आहेत. तसेच पेशंटस्‌साठी सर्वस्व पणाला लावणारे डॉक्टर आहेत. अपघात किती चिवित्र आणि क्षुल्लक कारणांनीही घडू शकतात असा एक प्रसंग (पृ. १२९) आहे. एकदा एक शाळकरी मुलगा शाळेत जात असताना, अगदी छोट्याशा अपघाताने मृत्यू न पावता, त्याच्या मृत्यूला स्कूलबॅगचा पट्टा कारण झाला होता. डोक्यावर पट्टा ठेवून पाठीवर दप्तर घेऊन चालला असताना पट्टा खाली सरकून गळ्यात आला आणि गळ्याला फास बसून तो मुलगा क्षणात मरण पावला.

खोटं बोलण्याने पुण्य पदरी पडलं हा डॉक्टराला आलेला नवीन अनुभव यात आहे. (पृ. ३९) 'गरज सरो, वैद्य मरो' असा अनुभव पेशंटस्‌कडून आलेले डॉक्टर या पुस्तकात भेटतात तर पेशंटवर डॉक्टरांनी केलेले उपकार परत फेडायला सिद्ध असलेले पेशन्टस्‌ही भेटतात. पेशंटस्‌नी डॉक्टरांवर केलेले निरतिशय प्रेम पाहून आपलेही डोळे पाणावतात. (पृ. ८८) 'मनोरुग्ण'मध्ये संवेदनशील, पारदर्शी मनांवर झालेले आघात वाचून मन दु:खी होते.

प्रथितयश डॉक्टरांची सविस्तर माहिती, त्यांनी वैद्यकीय क्षेत्रात केलेले महत्त्वाचे संशोधन, लिहिलेले शोधनिबंध. पुस्तकं, त्यांना मिळालेली पारितोषिके, परदेशात जाऊन केलेले काम या सर्वांविषयीची सविस्तर माहिती लेखिका या पुस्तकात देते. उदा. डॉ. रवीन थत्ते यांची 'प्लॅस्टिक सर्जन'मध्ये सविस्तर माहिती आहे. (पृ. १४७)

डॉक्टरी व्यवसायातील धोके, खाचखळगे, पेशंटस्‌च्या तक्रारी, पेशंटस्‌चे प्रश्न, औषधे, इंजेक्शने, ऑपरेशन्स, पोस्टमार्टेम इत्यादीविषयी भरपूर, विपुल माहिती या पुस्तकातून मिळते.

डॉक्टर आणि रोगी हे विषय तरी मन उदासीन करणारे, काळजी वाटायला लागून अस्वस्थ करणारे. आपण निरोगी

असलो तरी हा रोग आपल्याला भविष्यात होणार नाही ना याचा धसका घ्यायला लावणारे, मन गंभीर चिंतातूर करणारे हे विषय. पण असे असूनही विनोदाची पखरण या पुस्तकात आहे. 'डेंटिस्ट'मध्ये भरपूर विनोद आहे. 'लठ्ठपणाशी लढणारे डॉक्टर' यातही विनोद भरपूर पेरला आहे. 'बालरोग तज्ज्ञ' लेखातही, नवीन आईबाबा झालेले कसा अतिसावधपणा व फाजील जागरूकता ठेवतात आणि त्यामुळे डॉक्टरांचं मरण कसं ओढवतं (पृ. २९ वर) यासारखे प्रसंग वाचकांनी मुळातच वाचलेले बरे. या पुस्तकात गमती-जमती पुष्कळ आहेत. वसंत सरवटे यांनी काढलेली रेखाचित्रे पाहून हास्यरसनिर्मिती झाली नाही तरच नवल!

लेखिकेची सहज, सोपी शैली आहे. कृत्रिमतेचा लवलेश नाही. मुलाखती जिवंत व प्रत्ययकारी उतरल्या आहेत. निवेदनात प्रवाहीपणा आहे. काही विशिष्ट प्रकारे लेखिका स्वत:ला सादर करताना दिसते ते आकर्षक होते. उदा. लेखिकेची चिवट कातडी गप्पही बसू देईना. (पृ. १४७ - प्लॅस्टिक सर्जन) त्याचप्रमाणे 'लठ्ठपणाशी लढणारे डॉक्टर्स' या लेखात ती म्हणते, डॉ. विनोद धुरंधर यांना भेटायला लेखिका घरी गेली तेव्हा, 'स्वत: डॉक्टर', त्यांच्या पत्नी, मुलगा, सून, सर्वच कसे चवळीच्या शेंगेसारखे सडपातळ! त्यांच्या घरात त्यांचा छोटा नातूच काय तो गुटगुटीत म्हणावा असा. पण तेवढ्यानेही मला धीर आला. माझ्या जातीची, माझ्या पक्षाची (वय, महिने आठ फक्त का असेन!) गुटगुटीत पंथाची पुरस्कर्ती अशी एक तरी खुद्द डॉक्टरांच्या घरात आहे हे पाहून बरं वाटलं! स्वत:ला सादर करण्याची लेखिकेची ही पद्धत स्वाभाविक नैसर्गिक वाटते.

सर्वसाधारणपणे डॉक्टरांच्या पुढे रोगी शरीरानेच नव्हे तर, मनानेही जितका उघडा होतो, तितका क्वचितच दुसऱ्या कुणापुढे होत असेल. डॉक्टरांच्या चष्म्यातून त्यांना भेटलेले मनुष्यजातीचे विविधरंगी नमुने 'नाते जन्माचे' या पुस्तकातून भेटतात. शीर्षकही उचित आहे. लेखिकेने - डॉक्टर आणि पेशन्टस् यांच्या माध्यमातून वाचकांशी चांगला संवाद साधला आहे.

**नाते जन्माचे - शोभा बोंद्रे**

• पारख प्रकाशन • पृष्ठे : २२२ • मूल्य : ५० रुपये

---

# क्रांतिकारक त्र्यंबक गंगाधर मराठे

**स्वा**तंत्र्यवीर सावरकरांवर 'अभिनव भारत' या गुप्त क्रांतिकारक संघटनेचे श्री. त्र्यंबक गंगाधर मराठे हे कृतीशील सदस्य होते.

स्वातंत्र्यवीर सावरकर आणि त्यांचे 'अभिनव भारता'तील सदतीस सदस्यांवर 'ब्रिटिश शासनाविरुद्ध सशस्त्र कट केल्याचा' धारा १२१ ते १२३ अन्वये अभियोग दाखल करण्यात आला. वरील आरोपींमध्ये त्र्यंबक गंगाधर मराठे यांचाही समावेश होता. हा अभियोग दि. १५ सप्टेंबर १८९० ला न्यायालयात सुरू झाला. या अभियोगाचा निर्णय दि. २४ डिसेंबरला घोषित करण्यात आला. त्यात मुख्य आरोपी स्वातंत्र्यवीर सावरकर यांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली. तर त्यांचे सहकारी त्र्यंबक गंगाधर मराठे यांना दहा वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा देण्यात आली.

श्री. त्र्यंबक गंगाधर मराठे हे पेण येथे सरकारी ट्रेंड शिक्षक म्हणून सरकारी शाळेत नोकरी करीत होते. लंडनहून स्वातंत्र्यवीर सावरकरांनी पाठविलेले 'बॉम्ब मॅन्युअल' त्यांना मिळाले. त्यानुसार त्यांनी पेण येथे बॉम्ब तयार करण्याचा छुपा कारखाना उभारला होता. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी पाठविलेल्या पिस्तुलांपैकी दोन पिस्तुले त्यांच्याकडे होती.

'अभिनव भारत' क्रांति संघटनेचे सदस्य अनंत कान्हेरे यांनी नाशिकचे कलेक्टर जॅक्सन याचा विजयानंद नाट्यमंदिरात वध केल्याच्या प्रकरणी श्री. मराठे ही गुंतविले जाण्याची शक्यता होती. परंतु श्री. मराठे यांनी चपळाईने बॉम्बच्या कारखान्याचे साहित्य नष्ट केले. पिस्तुले हस्तांतरित केली. त्यामुळे ते बचावले.

परंतु नंतर स्वातंत्र्यवीर सावरकरांसह 'अभिनव भारता'च्या अडतीस क्रांतिकारकांवर ब्रिटिशांनी भरलेल्या राजद्रोहाच्या अभियोगात त्यांचाही समावेश होता आणि या खटल्यात मात्र त्यांना १० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा झाली. अनंत कान्हेरे यांचे साथीदार कृष्णाजी गोपाळ कर्वे व विनायक नारायण देशपांडे यांना १८ एप्रिल १९१० ला ठाणे येथील तुरुंगात फाशी दिली.

भारतीय स्वातंत्र्ययुद्धात सहभागी झालेल्या देशभक्तांत, क्रांतिकारक त्र्यंबक गंगाधर मराठे यांचाही महत्त्वाचा सहभाग होता हे कळल्यावर मराठे परिवाराला निश्चितच अभिमान वाटेल.


संदर्भ : श्री. शि. ल. करंदीकर लिखित, 'सावरकर चरित्र' दुसरी आवृत्ती - दि. २८ मे १९४७, डॉ. वि. म. भट लिखत, 'अभिनव भारत.'

**- संकलन : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे (पृ. १२०), मुंबई**

# अष्टविनायक दर्शन
# ‘‘तुझा महिमा आगळा...’’

**महाराष्ट्रात वर्षभर चालणारी एक यात्रा म्हणजे अष्टविनायक यात्रा! अनेक गणेशभक्त नवीन कार्याला सुरुवात करताना किंवा नवीन वर्षाच्या सुरुवातीला अष्टविनायकाची यात्रा करतात. विनायक म्हणजे गणपती आणि अष्ट म्हणजे आठ. अष्टविनायक म्हणजे महाराष्ट्रातले प्रतिष्ठेचे मानले जाणारे आठ गणपती होय! या सर्व गणपतींना पेशवे काळापासूनची परंपरा असल्यामुळे हे गणपती मानाचे गणपती म्हणून ओळखले जातात.**

### मोरगाव



अष्टविनायकांपैकी पहिला गणपती म्हणजे मोरगावचा मोरेश्वर. ‘मयुरेश्वर’ असंही या गणेशाला संबोधलं जातं. पुण्यापासून मोरगाव सुमारे ७० किलोमीटर अंतरावर आहे. महाराष्ट्राचं कुलदैवत जेजुरीचा खंडोबा मोरगावपासून केवळ अर्ध्या तासाच्या अंतरावर आहे. मोरेश्वर गणेशाचं स्वयंभू व आद्यस्थान आहे. प्रत्येक घरात म्हटली जाणारी ‘सुखकर्ता दु:खहर्ता’ ही आरती समर्थ रामदास स्वामींना याच मंदिरात स्फुरली असं म्हटलं जातं. या गणपती मंदिरात अनेक प्रकारचं नक्षीकाम पाहायला मिळतं. मोरेश्वराच्या डोळ्यात व बेंबीत हिरे बसवलेले आहेत. या मंदिराभोवतीचं बुरूजसदृश दगडी बांधकाम प्राचीन आहे. मोरगावला जाण्यासाठी पुणे, बारामती आणि जेजुरीपासून वाहातुकीचे पर्याय उपलब्ध आहेत.

### थेऊर




थेऊरचा चिंतामणी हा अष्टविनायकांमधला दुसरा गणपती आहे. थेऊरच्या कदंब वृक्षाखाली हे गणेशाचं ठिकाण आहे. चिंतांचं हरण करणारा म्हणून याला ‘चिंतामणी’ असं म्हणतात. या गणपतीला पेशवे काळापासून मोठा इतिहास आहे. थेऊर हे पुणे-सोलापूर महामार्गाला जोडलेल्या रस्त्यावर असून पुण्यापासून ते ३० कि.मी. अंतरावर आहे. मंदिराच्या आवारात थेऊरचा विस्तार आणि विकास करण्यात महत्त्वाची भूमिका बजावलेल्या माधवराव पेशव्यांची स्फूर्तिदायक कारकीर्द दाखवणारे कलात्मक दालन आहे. तसंच त्यांच्या निधनानंतर सती गेलेल्या त्यांच्या पत्नी रमाबाई यांची समाधीदेखील आहे.

### सिद्धटेक



सिद्धटेकचा सिद्धिविनायक हा अष्टविनायकांपैकी तिसरा गणपती. भीमा नदीवर वसलेलं हे सिद्धिविनायकाचं स्वयंभू स्थान आहे. याचा गाभारा लांबी-रुंदीने भरपूर मोठा आहे. तसंच मंडपही प्रशस्त आहे. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी जीर्णोद्धार करून हे मंदिर बांधलं. मंदिरात पितळी मखर असून त्याभोवती चंद्र-सूर्य-गरुड यांच्या प्रतिमा आहेत. अहमदनगर जिल्ह्यातल्या कर्जत तालुक्यात हे ठिकाण असून दौंडपासून १९ कि.मी. अंतरावर आहे.


### रांजणगाव



रांजणगावचा महागणपती हा अष्टविनायकांपैकी चौथा गणपती. अष्टविनायकांपैकी सर्वाधिक शक्तिमान मानलं जाणारं महागणपतीचं हे रूप आहे. हे महागणपतीचं स्वयंभू स्थान असून दहाव्या शतकापासून अस्तित्वात आहे. महागणपती उजव्या सोंडेचा असून गणेशाला कमळाचं आसन आहे. गणेशाला दहा हात आहेत. श्रींची मूर्ती प्रसन्न आणि अतिशय मनमोहक आहे. माधवराव पेशव्यांच्या काळात या मंदिराचा जीर्णोद्धार केल्याचं इतिहासात आढळतं. इंदूरचे सरदार किबे यांनीदेखील मंदिराचं नुतनीकरण केल्याचा उल्लेख आढळतो. पुणे-अहमदनगर मार्गावर शिरूर तालुक्यात हे ठिकाण आहे.

महागणपतीची एक दंतकथा फार प्रसिद्ध आहे. त्रिपुरासूर या दैत्याला शिवशंकरांनी काही शक्ती प्रदान केल्या होत्या. या शक्तींचा दुरूपयोग करून त्रिपुरासूर स्वर्गलोक व पृथ्वीलोक इथल्या लोकांना त्रास देऊ लागला. शेवटी एक वेळ अशी आली की, शिवशंकराला श्री गणेशाचं नमन करून त्रिपुरासुराचा वध करावा लागला. म्हणून या गणेशाला 'त्रिपुरारिवदे महागणपती' असंही म्हटलं जातं.

**ओझर**



अष्टविनायकांपैकी ओझरचा विघ्नेश्वर हा पाचवा गणपती आहे. अष्टविनायकांमधला सर्वांत श्रीमंत गणपती असण्याचा मान विघ्नेश्वरला जातो. विघ्नेश्वराची मूर्ती लांब आणि रुंद असून डोळ्यात माणिक, कपाळावर हिरा आहे. अशी प्रसन्न आणि स्वयंभू मूर्ती असलेला गणेश विघ्नांचं हरण करतो, म्हणून त्याला विघ्नेश्वर म्हणतात.

कुकडी नदीच्या तीरावर असलेलं हे मंदिर एक जागृत स्थान आहे. मंदिराच्या चारही बाजूंना तटबंदी-बांधकाम असून, मध्यभागी गणेशाचं मंदिर आहे. थोरल्या बाजीराव पेशव्यांचे बंधू चिमाजी अप्पा यांनी या मंदिराचा जीर्णोद्धार केल्याचा उल्लेख इतिहासात आढळतो.


लेण्याद्रीपासून हा गणपती १४ किलोमीटर अंतरावर तर पुण्यापासून ७५ किलोमीटर अंतरावर आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचं जन्मस्थान असलेला शिवनेरी किल्लादेखील जवळच आहे.

**लेण्याद्री**



अष्टविनायकांपैकी सहावा गणपती म्हणजे लेण्याद्रीचा गिरिजात्मक. जुन्नर लेण्यांच्या समुदायात आणि कुकडी नदीच्या परिसरातील डोंगरावर गिरिजात्मज गणेशाचं स्वयंभू स्थान आहे. गिरिजात्मकाची प्रसन्न मूर्ती दगडामध्ये कोरलेली असून मंदिर परिसरात दगडी खांब आहेत व त्यावर वाघ, सिंह, हत्ती असं सुंदर नक्षीकाम आहे. मंदिरात जाण्यासाठी डोंगरावर सुमारे ४०० पायऱ्या आहेत. पेशवे काळात या मंदिराचा जीर्णोद्धार झाला होता. हा गणपती जुन्नरपासून ७ किलोमीटर अंतरावर तर पुण्याहून सुमारे ९७ किलोमीटर अंतरावर आहे.

**महड**



महडचा वरदविनायक हा अष्टविनायकांपैकी सातवा गणपती आहे. हे स्वयंभू स्थान असून त्याला 'मठ' असंही म्हणतात. वरदविनायकाचं मंदिर साधं, कौलारू असून मंदिराला घुमट आहे व सोनेरी कळस आहे. कळसावर नागाची नक्षी आहे.

या मंदिरासंदर्भात एक कथा सांगितली जाते. एका गणेश भक्ताला मंदिराच्या मागच्या बाजूस असलेल्या तळ्यात गणेशाची मूर्ती पडल्याचं स्वप्न पडलं. त्यानुसार त्याने शोध घेतला आणि त्याठिकाणी त्याला मूर्ती मिळाली. मंदिरात प्रतिष्ठापना केलेली मूर्ती हीच होय. मंदिरात दगडी महिरप असून गणेशाची मूर्ती सिंहासनारूढ आहे व उजव्या सोंडेची आहे. इ. स. १७२५ मध्ये पेशवे काळात हे मंदिर बाधण्यात आले.

**पाली**



पालीचा गणपती हा अष्टविनायकांपैकी आठवा गणपती आहे. या गणपतीला बल्लाळेश्वर म्हणतात. बल्लाळेश्वर गणपतीचं हे स्वयंभू स्थान आहे. मंदिर पूर्वाभिमुख आहे. गणेशाचं कपाळ विशाल असून डोळ्यात हिरे आहेत. मंदिर चिरेबंदी आहे. मंदिरात प्रचंड घंटा असून ती चिमाजी अप्पांनी अर्पण केली आहे. हे स्थान रायगड जिल्ह्यातल्य सुधागड तालुक्यात असून, सुधागड या भव्य किल्ल्याची पार्श्वभूमी व अंबा नदीच्या निसर्गरम्य सान्निध्यात बल्लाळेश्वराचं मंदिर वसलं आहे.

अष्टविनायक दर्शनासाठी पुणे, अहमदनगर, रायगड या तीन जिल्ह्यांतून प्रामुख्याने प्रवास होत असल्यामुळे तिथे प्रवासाचे पर्याय जास्त प्रमाणात उपलब्ध आहेत. अष्टविनायकाच्या मूर्ती निरनिराळ्या रूपांत कुठे डोंगरात, कुठे खडकात, तर कुठे नदीकाठी असल्यामुळे ही यात्रा करणाऱ्या भाविकाला पर्यटनाचाही चांगला अनुभव मिळतो. या अष्टविनायकांची महती केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित नसून संपूर्ण भारतभर पसरली आहे.

# दिशासातत्याची राखण

डॉ. अभिजित फडणीस



लोकसभा निवडणुकीच्या पूर्वी अंतरिम अर्थसंकल्प सादर करताना अर्थमंत्री निर्मला सितारामन यांचे भाषण हे गेल्या दशकाचा आढावा घेणाऱ्या अहवालाचा संदर्भ ठेवत खूपच छोटेखानी झाले होते. सरकार ज्या क्षेत्रांना प्राथमिकता देणार आहे अशा काही क्षेत्रांबद्दल संकेत करून, निवडणुकीनंतर काही महिन्यानंतर अधिक तपशिलात ते मांडायची संधी मिळेल हा आशावाद त्यांनी व्यक्त केला होता. काही सकारात्मक गोष्टी अंतरिम अर्थसंकल्पानंतर पुढे आल्या. सन २०२३-२४ चे प्रत्यक्ष कराचे सरकारचे उत्पन्न अंदाजापेक्षाही चांगलेच वाढीव आहे. त्यामुळे वित्तीय शिस्तीचे पालन करणे सरकारला सोपे गेले. सन २०२३-२४ च्या मूळ अर्थसंकल्पात तूट ५.९ टक्के योजलेली असूनही प्रत्यक्षात ती ५.६ टक्के एवढी खाली आली. तसेच सन २०२४-२५ मध्ये आत्तापर्यंतचे सरकारचे प्राप्तिकर उत्पन्नदेखील घसघशीत वाढले आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर निवडणुकीनंतर सादर झालेल्या अर्थसंकल्पात प्रत्यक्ष करात काही भरीव सवलती सरकार देईल का, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले होते. कराच्या ढाच्यांमध्ये आणि नोकरदारांच्या वजावटीत काही प्रमाणात सवलती मिळाल्या असल्या तरी शेअर बाजाराकडे मोठ्या प्रमाणावर वळलेल्या लोकांच्या अपेक्षा पूर्ण होतील की नाही, याबाबत मात्र शंका आहे. कारण दीर्घ गुंतवणुकीवरील नफ्यावरचा कर दहा टक्क्यांवरून १२.५० टक्के असा वाढला आहे आणि अल्प मुदतीच्या गुंतवणुकींवरचा कर १५ टक्क्यांवरून २० टक्के असा झाला आहे. बाँड गुंतवणूकदारांना कदाचित यातून फायदा होऊ शकेल; मात्र त्याचा तपशील तपासून बघावा लागेल. फ्युचर्स आणि ऑप्शन्स यांकडे मोठ्या प्रमाणावर वळलेल्या तरुणाईवर एसटीटीचा भार पडणार आहे. तसेच रिअल इस्टेटमध्ये होणाऱ्या दीर्घकालीन नफ्यावरच्या कराची प्रणालीदेखील आता बदलली आहे. त्याचाही मागोवा घ्यावा लागेल.

वैयक्तिक करदात्याच्या दृष्टीने काहीसे नैराश्य किंवा मिश्र भावना असली, तरी अर्थव्यवस्थेचा एकंदरीत विचार करता, धोरणसातत्य राखणारा आणि पुढील प्रगतीचा, तसेच वृद्धीचा मार्ग अधोरेखित करणारा हा अर्थसंकल्प आहे, असे म्हटले तर वावगे ठरू नये. सन २०१४-१५ मध्ये पायाभूत साधने निर्माण करणारा भांडवली खर्च सव्वादोन लाख कोटी रुपये होता, तो २०२४-२५ मध्ये पाचपट, म्हणजे प्रस्तावित ११,११,१११ कोटी रुपये एवढा वाढला आहे. चालू खर्चावर आणि वित्तीय तुटीवर अंकुश ठेवत हे केले गेले आहे, हे विशेष. रस्ते, विमानतळ, रेल्वेच्या द्वारे माल आणि प्रवासी वाहतूक, तसेच डिजिटल आणि सामाजिक क्षेत्रातील पायाभूत साधने या सर्वच दृष्टीने जनसामान्य त्याची गुणवत्ता अनुभवतो आहे. मात्र त्याचबरोबर व्याजापोटी सरकारला द्यावी लागणारी वार्षिक रक्कमदेखील याच काळात सव्वाचार लाख कोटींवरून जवळजवळ १२ लाख कोटींपर्यंत पोहोचली आहे आणि त्यामुळे पुढील काळातील उत्तम वित्तीय शिस्तीचा विचार करता, सर्व २०२४-२५ मध्ये वित्तीय तूट ५.१ टक्के एवढी खाली आणण्याचा अंतरिम अर्थसंकल्पात उल्लेख होता; ती आता ४.९ टक्के एवढीच असेल. पुढील वर्षी ती कदाचित ४.५ टक्क्यांपेक्षाही खाली येऊ शकते. त्यामुळे अर्थव्यवस्थेला अधिक चांगली चालना मिळेल आणि त्यातून काहीसे मागे पडलेले खासगी उद्योगांचे गुंतवणूक चक्र पुन्हा वेग घेईल. सामान्य माणसासाठी कर्जावरच्या व्याजाचा बोजा कमी होण्यासाठीदेखील ते महत्त्वाचे आहे.

'जय जवान, जय किसान, जय विज्ञान' यांच्याबरोबर 'जय अनुसंधान' अशी भूमिका सरकारची असणार आहे, असे अर्थमंत्र्यांनी गेल्या वेळेला घोषित केले होते. या घोषणेचा थेट उल्लेख या भाषणात झाला नाही. मात्र या क्षेत्रातील धोरणसातत्य आणि मोजक्या प्रमाणात नावीन्य या अर्थसंकल्पात बघायला मिळाले. संरक्षण क्षेत्रासाठी ४.५४ लाख कोटी रुपयांचे, शेती

आणि ग्रामविकासासाठी ४.१८ लाख कोटी रुपयांचे नियोजन हे या घोषणेला अनुरूप. पुढील दोन वर्षांत एक कोटी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीकडे वळवण्याचा उच्चार अर्थसंकल्पात करण्यात आला. विज्ञान आणि अनुसंधानाच्या बाबतीत छोट्या प्रमाणावरील अणुऊर्जा, संयंत्रके, नवीन तंत्रज्ञानाची औष्णिक ऊर्जा निर्मिती केंद्रे, शास्त्रीय अनुसंधानासाठी एक लाख कोटीचा निधी उभा करणे या बाबीदेखील उल्लेखनीय.

तळागाळातील माणसाचा विचार केला, तर इतर अनेक योजनांबरोबरच २.६ कोटी घरे जरी बांधली गेली असली तरी खूप मोठ्या प्रमाणावर घरे अजून बांधली जाण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली ही सकारात्मक गोष्ट. जनजाती समाजाचा लाभ होण्यासाठी भरघोस तरतूद, तसेच २५,००० गावांपर्यंत सडक पोहोचविण्याची घोषणा त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी महत्त्वाची. स्त्रिया, मुली या घटकासाठी तीन लाख कोटी रुपयांची तरतूदेखील लक्षणीय म्हणता येईल. तरुण वर्गाचा विचार केला, तर रोजगार निर्मितीच्या दृष्टीने काही कल्पक योजना आखलेल्या दिसतात. ५०० मोठ्या कंपन्यांमध्ये एक कोटी शिक्षणार्थी एक वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव घेतील आणि त्यासाठी महिन्याला पाच हजार रुपये कंपन्यांकडून भत्ता आणि शिवाय सरकारकडून अनुदान अशी घोषणा करण्यात आली आहे. ती प्रत्यक्ष अनुभव घेण्याच्या दृष्टीने आणि पुढील करिअरसाठी अतिशय आवश्यक. कंपन्यांना त्यांच्या सीएसआर फंड्सचा १० टक्के उपयोग यासाठी करता येईल. या शिवाय प्रथमच नोकरी मिळणाऱ्या तरुणांना आणि त्यांना नोकरी देणाऱ्या आस्थापनांना सरकारकडून अनुदानरूपी मदत ही रोजगार निर्मितीसाठी सकारात्मक आणि कल्पक. बदलत्या काळानुसार नव्या तंत्रज्ञानाला सामोरे जाण्यासाठी थोडेसे महाग शिक्षण घ्यावे लागले, तरी त्यासाठी कर्जहमी आणि व्याजात सहाय्य अशी घोषणा देखील करण्यात आली आहे ती नक्कीच उपयोगी. २० लाख तरुणाईला प्रशिक्षण रचना आणि एक हजार आयटीआयना नवीन गरजांच्या अनुरूप घडवणार, ही घोषणा स्वागतार्ह; पण ते प्रत्यक्षात कसे आणले जाते याचे कुतूहल देखील तेवढेच!

उद्योग वाढीसाठी कर्जाची उपलब्धता अत्यंत आवश्यक. कर्जदाराची परतफेडक्षमता हा त्यातील महत्त्वाचा विषय असणे साहजिकच आहे. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी कर्जदाराची क्षमता जोपासताना पारंपरिक मालमत्ता आणि विक्री या दोनच मापदंडांऐवजी स्वत:ची डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून वेगळी रचना उभी करावी याची घोषणा केली गेली आहे. अर्थात ती वेगाने प्रत्यक्षात आणणे सोपे नाही; पण दिशा नक्कीच योग्य. आपल्या ताब्यात नसलेल्या कारणांमुळे अडचणीत सापडलेल्या उद्योगांना अडचणीतून बाहेर येण्यासाठी साहाय्य हेदेखील स्वागतार्ह. तसेच मुद्रा कर्ज घेऊन त्याची योग्य प्रकारे परतफेड करणाऱ्यांसाठी कर्जाची मुदत ही १० लाख रुपयांवरून २० लाख रुपये अशी करण्यात येणार आहे. कर्जशिस्त वाढविण्यासाठी हा चांगला दृष्टिकोन आहे. सिडबीचा विस्तारदेखील छोट्या उद्योगांसाठी उपयोगी ठरेल. छोट्या उद्योगांना आणि हस्तकलेवर आधारित उद्योग करणाऱ्यांना निर्यातीचा बाजार उपलब्ध व्हावा म्हणून रचना उभी केली जाणार आहे त्याचाही लाभ घेऊन परकीय बाजारांना गवसणी घालणे सोपे जाईल. शेतीसाठी क्लस्टरची घोषणादेखील अशीच उपयोगी.

येणाऱ्या काळाचा विचार करता प्राप्तिकर रचना सुटसुटीत व्हावी म्हणून पुढील सहा महिन्यांत फेरआढावा घेण्यात येणार आहे आणि पूर्णपणे नवीन ढाचा आणला जाणार आहे. त्याकडे, तसेच जीएसटी रचना कशी अधिक सुलभ आणि परिपूर्ण करण्यात येईल, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असेल. आत्तापर्यंत निवडणूक डोळ्यांसमोर ठेवून सवंग लोकानुनय सरकारने टाळला होता; मात्र या वेळच्या अर्थसंकल्पात राजकीय संदर्भ अधोरेखित झाले आहेत. बिहार ते आंध्रप्रदेश अशा पट्ट्याचा 'पूर्वोदय' हा त्याचेच द्योतक आहे. तो पुरेसा ठरतो का हे काळ ठरवेल! ◆





**जात्याचा खालचा दगड स्थिर असतो.**
**वरचा दगड फिरणारा असतो.**
**दोन्ही फिरणारे असते तर दळण घडले नसते.**
**आत्मविश्वासाचा पाया स्थिर हवा.**
**मग त्यावरचा कर्माचा दगड प्रारब्ध गतीने फिरत राहिला तर संकटे, चिंता, काळजी यांचे पीठ होते.**

# गुरुतुल्य श्रीपाद शांताराम ठाकूरदेसाई

◆ हेमंत अरुण मराठे/शरद अरुण मराठे

**दि.** १८ जून २०२३ रोजी आमचे वडील ती. भाई (श्रीपाद शांताराम ठाकूरदेसाई) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. खरंतर आमचे पितृछत्र आम्ही १९६९ साली आम्हाला समज येण्यापूर्वीच गमावले होते. तेव्हा आमच्या आईचे वय फक्त चोवीस वर्षांचे होते. मात्र आजी-आजोबांनी आमची जबाबदारी घेत तिला नर्सिंग कोर्सला पाठवले. तिने नर्स म्हणून कणकवली सारख्या शहरापासून अतिशय दुर्गम अशा खेड्यांपर्यंत सगळीकडे उत्तम अशी सेवा बजावली.



दरम्यानच्या काळात आजी-आजोबा, मामा, मावशा आणि मैत्रिणी यांच्या पुढाकाराने आणि सहकार्याने ती. भाईंबरोबर संसाराची दुसरी इनिंग सुरू केली आणि साडेचार दशके उत्तमरित्या निभावली. कणकवली परिसरात त्यांचे सहजीवन अतिशय आदर्शवत असे ओळखले जाते. मुख्य म्हणजे दोघांनाही ठाकूरदेसाई आणि मराठे या दोन्ही परिसरात अतिशय महत्त्वाचे आणि आदराचे स्थान आहे. दोन्ही परिवारातील कोणत्याही प्रसंगात किंवा कार्यक्रमात या दोघांचा अगत्यपूर्ण सल्ला आणि उपस्थिती अनिवार्य असायची. ती. भाईंच्या शेवटच्या आजारपणात आईने पुढे काय होणार याची पूर्ण कल्पना असूनही जवळपास दहा महिने धीरोदात्तपणा दाखवत स्वत:ला पूर्ण वाहून घेत त्यांची केलेली सेवा आणि त्यांची शेवटची इच्छा पूर्ण करण्यासाठी घेतलेला देहदानाचा निर्णय अतिशय कौतुकास्पद ठरला.

ती. भाईंनी आपले चाळीस वर्षांचे शिक्षणक्षेत्रातील करिअर कणकवली तालुक्यातच पूर्ण केले. त्यांच्या निधनानंतर त्यांचे माजी विद्यार्थी, सहकारी आणि ग्रामस्थानी त्यांना वाहिलेल्या श्रद्धांजलीत त्यांच्या आदर्शवत जीवनाचा आढावा घेतला आहे. तो सर्वांसाठी इथे देत आहोत.

कै. श्रीपाद ठाकूरदेसाई गुरुजी, नाडकर्णीनगर, कलमठ कणकवली. गुरू शिष्याच्या अलौकिक नात्यातून सुसंस्कृत समाजाची जडणघडण होते. गुरूची नि:स्वार्थी ज्ञानदानाची तळमळ शिष्याच्या यशकलशाचा पाया रचते. सूर्याच्या प्रखरतेबरोबर चंद्राची शीतलता निर्माण करणारे शिक्षक नेहमीच विद्यार्थीप्रिय असतात. असेच विद्यार्थीप्रिय शिक्षक कै. ठाकूरदेसाई गुरुजी आज जरी काळाच्या पडद्याआड गेले असले तरीही विद्यार्थ्यांसाठी अंतरंगाचा प्रकाश आहेत. विद्यार्थ्यांसाठी प्रेरणेचा स्रोत असणारे देसाई गुरुजी निवृत्तीनंतरसुद्धा कधीच मुलांच्यापासून लांब गेलेच नाहीत.

खरंतर १९७८ मध्ये देसाई गुरुजी करूळच्या शाळेतून बदली होऊन कलमठ-कुंभारवाडा शाळेत आले. सुरुवातीलाच शाळेच्या विटांच्या इमारतीला मातीचा गिलावा चढवून रंगरंगोटी केली आणि खऱ्या अर्थाने त्या इमारतीचे ज्ञानमंदिर झाले. गुरुजींच्या सौंदर्य दृष्टीतून भग्नावस्थेतील भिंतींना रूप आले. सकाळची आणि संध्याकाळची प्रार्थना श्रवणीय झाली तर सकाळच्या प्रार्थनेच्या वेळी मुलांच्या सामान्य ज्ञानवाढीवर विशेष भर देताना त्या आधारित प्रश्नोत्तरांची आवड मुलांना लावली. मुलांना वक्तशीरपणा शिकवतांना गुरुजी शाळेच्या वेळेआधी स्वत: हजर असायचे. शाळेत स्कुटरवरून येणारे देसाई गुरुजी हे कदाचित त्या काळातले एकमेव शिक्षक असतील. एका हातात हेल्मेट, दुसऱ्या हातात पिशवी, कडक इस्त्रीचे कपडे आणि चालण्यातील गतीने व्यक्तिमत्त्व स्वाभाविकच छाप पडायची.

रत्नागिरी जिल्ह्याचे तत्कालीन शिक्षणाधिकारी कै. टि. बुच्चेना आणि एस. पी. खानोलकर शाळा तपासणीसाठी शाळेवर अचानक आले. शाळेची शिस्त आणि शिक्षणाचा स्तर पाहून प्रभावित झाले आणि गौरव पत्र मुख्याध्यापकांच्या नावाने शाळेला पाठवले. खास करून शाळेची शिस्त सांभाळताना मुख्याध्यापकांना जे सहकारी मिळाले, असे सहकारी मिळणे खूप कठीण गोष्ट आहे याचा उल्लेख होता. सर्जनशीलता माणसाला स्वस्थ बसू देत नाही. गुरुजींनी अंगणाचा मंडप घालण्याचे ठरविले. कारण मुलांना बसायला वर्ग कमी पडत

होते. हा मंडप त्यावेळी बावीस हजारात झाला. या मंडपासाठी विशेष मदत मुंबईतील चाकरमान्याची होती. हे पैसे गोळा करण्यासाठी मुंबईला जायचे ठरले. गुरुजींबरोबर कोणीतरी सहकारी शिक्षक असणार होते. पण मुंबईला जाण्यायेण्याचा खर्च वैयक्तिक करण्याचा गुरुजींचा आग्रह होता. शाळेचा फंड त्यासाठी गुरुजींनी दिला नाही. मुंबईतील प्रत्येक घरी जाऊन देसाई गुरुजी, श्री. वर्देकर गुरुजी आणि कै. पु. शि. चिंदरकर यांनी मंडपासाठी देणगी गोळा केली. याच मंडपाचे काम चालू असताना एका ग्रामस्थाने नंतर पैसे देण्याच्या अटीवर सिमेंटची पिशवी नेली. त्यानंतर त्या पिशवीचे पैसे शाळेत जमा केलेच नाहीत. गुरुजींनी स्वत:च्या खिशातून सत्तेचाळीस रुपये जमा केले. का? तर शाळेचा खर्च ही माझी जबाबदारी आहे.

शाळेसाठी वाहून घेतलेल्या देसाई गुरुजींनी शाळेच्या परिसरात नारळाची झाडे लावली. आज नारळाचे उत्पन्न शाळेला मिळते. हे सगळे उपक्रम राबवणाऱ्या गुरुजींनी खास करून लोकांना सहभागी करून घेतले. बहुतांश ग्रामस्थ हे शेतकरी असल्याने शाळेसाठी मदत करणे कठीण होते म्हणून ग्रामस्थांनी दोन पायली भात द्यायचे ठरले. ही कल्पना गुरुजींचीच. भात विकून जमा झालेल्या पैशातून अनेक अपूर्ण कामे पूर्ण झाली. शाळेसाठी एक वर्ग उभा राहिला, कंपाऊंड वॉल तयार झाली. गुरुजींच्यामुळे शाळेची ओळख निर्माण झाली आणि नावाची पहिली पाटी शाळेला मिळाली. आणखी एका कल्पनेतून शाळेच्या दैनंदिन गरजा (केरसुणी, फळ्यावरचा खडू इ.) भागविण्यासाठी मुलांकडून दर बुधवारी दहा पैसे जमा करण्यास सुरुवात केली.

दहा मिनिटाच्या मधल्या सुट्टीतले चहापान आटोपल्यावर लगेचच गुरुजी वर्गावर निघून जायचे. साहजिकच इतर शिक्षकांनाही गप्पा-गोष्टीत कधीच रमता आले नाही.

सर्जनशील, सौंदर्यशील, वक्तशीर, हजरजबाबी, अजातशत्रू, अतिशय प्रेमळ असे अनेक पैलू गुरुजींच्या व्यक्तिमत्त्वाला होते तर प्रसन्न व्यक्तिमत्त्वाच्या चेहऱ्यावरचं स्मितहास्य अखेरपर्यंत तसंच राहिलं. खास वैशिष्ट्य म्हणजे गुरुजींनी दिलेला शब्द कधीही मोडला नाही. अगदी वैयक्तिक जीवनातसुद्धा त्याच शब्दाला बांधील राहिले. गुरुजी स्वत:च्या मुलांबरोबर नातवंडांतही रमले तर त्यांना त्याच प्रेमाची परतफेडसुद्धा मिळाली म्हणून त्यांचा अखेरचा काळसुद्धा आनंदात गेला. गुरुजींनी प्रेम दिलं आणि प्रेम घेतलं. त्यांची जीवनमुल्ये ही तत्त्वनिष्ठ होती. त्या तत्त्वाशी गुरुजी एकनिष्ठ राहिले, त्यात कधीच तडजोड झाली नाही.

अतिशय साधी राहणी असणारे गुरुजी अखेरपर्यंत स्वावलंबी जीवन जगले. सात्त्विक जेवण, योग, प्राणायाम याबरोबर बोलण्याचा आग्रह गुरुजींचा राहिला किंवा नव्वदीनंतर सुद्धा त्याच गतीने गुरुजींनी सगळी दप्तरी कामे केली. खूप थोड्या लोकांना मानसन्मान मिळतो, तो गुरुजींना मिळाला. १९९१ सालच्या शाळेच्या निरोप समारंभाच्या भरगच्च कार्यक्रमात अनेकांना भरून आले तर त्या भावना व्यक्त करताना अश्रूसुद्धा अनावर झाले होते. माणसं येतात-जातात पण आठवणींचे गाठोडे फार कमी माणसांना तयार करता येते. गुरुजींनी दिलेल्या या गाठोड्यातील शिदोरी आहे ती मार्गदर्शनाची. आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक क्षणाला तोंड देण्याची. मार्गदर्शनाची.

उद्याच्या गुरुपौर्णिमेच्या दिवशी आशीर्वाद देणारे हात आज काळाच्या पडद्याआड गेलेत पण मस्तक ठेवलेल्या चरण स्पर्शाचा सुगंध आम्हा विद्यार्थ्यांसाठी दरवळत राहील हे नक्की!

❖

## वारा

पाण्यावर उठणारे इतके तरंग
वाऱ्याने मारलेली जणू हळूवार फुंकर

गवताची पाती वाकून होती जमिनीशी बद्ध
वाऱ्याचे जणू मर्दानीपण

हळुवार गुदगुल्या करणारा तो हवाहवासा स्पर्श
वाऱ्याने दिलेले जणू अलगद आलिंगन

जे दिसणारे काटे टोचून बेजार करणारा
वाऱ्याचा जणू संताप अनावर

ढगांना दिशा दाखवून मार्गी वळवणारा
वारा जणू दिशा तज्ज्ञ

परागकणांना वाहून नेणारा
वारा जणू दूतच

तनामनात सतत वाहणारा
वारा जणू चैतन्याचा अमृतकुंभ

# एक फिक्शन अथवा फँटसी

## (अद्‌भूत काल्पनिक शाब्दिक प्रपंच)

◆ संजय रामचंद्र मराठे (पृ. ४१६), अमरावती                भ्रमणध्वनी : ९४२१७४०८९४

कुस्ती मध्ये **काटें की लढत** म्हणजे आत्ता पर्यंत मी समजायचो की **अटीतटीचा सामना**. पण विनेश फोगाट आणि अमन सेहरावत यांच्या बाबतीत घडलेल्या ऑलिम्पिक मधील घटनांवरुन काटे की लढतचा अर्थ अटीतटीचा सामना नसून कुस्तीगीरांना, मग ती स्त्री असो की पुरुष कोणत्याही कुस्ती आधी आणि नंतर **वजनाच्या काट्यांशी** टक्कर द्यावी लागते आणि ही लढत पंधरा मिनिटाची अटीतटीची असते. तीच खरी **काटे की टक्कर**.

आणखीन एक नवीन माहिती ही या निमित्ताने मिळाली ती म्हणजे असे तंत्रज्ञान या आर्टिफिशियल इंटिलीजंसच्या जमान्यात मानवाच्या शारीरिक वजनाच्या बाबतीत विकसित झाले आहे की ज्यामुळे बारा तासात चार किलो सहाशे ग्रॅम वजन कमी होतं आणि पुन्हा दुसरं वैशिष्ट्य म्हणजे सहा मिनिटांच्या झटापटी नंतर किंवा खटापटी नंतर अडीच ते साडेचार किलो पर्यंत मानवी शरीराचे वजन वाढतंही.

आर्टिफिशियल इंटिलीजंसच्या तंत्रज्ञानाचा वापर करून परदेशातून सोनं ही चोरुन आणता येईल कां असे विचार स्मगलर्सच्या मनात येऊन विमानतळावर जाऊन विमानात बसण्यापूर्वी सोन्याचे वजन अडीच ते साडेचार किलो कमी करुन घ्यायचे आणि कस्टम मधून चेक आऊट झाल्याबरोबर पुन्हा तितकेच वाढवून घ्यायचे.

पण सध्यातरी मानवी शरीराच्याच बाबतीत हे तंत्रज्ञान ऑलिम्पिकमध्ये सिद्ध आणि शक्य झालेले दिसत आहे.

इतर भौतिक पदार्थांच्या बाबतीत तेवढे AI तंत्रज्ञान विकसित व्हायचे आहे असं मला वाटतं. पण फिक्शन फँटसी म्हणून माझ्या या लेखनाचा विचार व्हायला हवा असे वाटते.

---

# स्वच्छ समुद्रकिनारा... केशवसुतांचं जन्मघर

**अ**नेक दिवसांपासून गणपतीपुळ्याला जायची फार इच्छा होती. रात्रभर प्रवास करून आम्ही सगळे कुटुंबीय पहाटे गणपतीपुळ्याला पोहोचलो. मंदिरात अजिबात गर्दी वा गोंगाट नव्हता. गणपती बाप्पाचं निवांतपणे दर्शन घेता आलं. तिथेच सभागृहात सर्व लोक बसून अथर्वशीर्ष म्हणत होते. फारच प्रसन्न वाटत होतं. देवळाजवळच असलेल्या समुद्रावर जायची फार इच्छा होती. पण ऊनही खूप होतं आणि समुद्रावर फार गर्दी होती. त्यामुळे आम्ही तिथूनच जवळ असलेल्या मालगुंडला केशवसुतांचं स्मारक बघण्याचं ठरवलं.

मालगुंड म्हणजे कविवर्य केशवसुत यांचं जन्मस्थान. कोकण मराठी साहित्य परिषदेने मालगुंड येथे केशवसुतांचं




जन्मघर आणि तिथला आजूबाजूचा परिसर येथे एक भव्य आणि देखणं केशवसुत स्मारक उभं केलं आहे. त्यांचं कौलारू घर फारच सुंदर आहे. या स्मारकामध्ये दोन मोठी दालनं आहेत. एका दालनात ग्रंथालय, वाचनालय आणि दुसऱ्यात आधुनिक मराठी काव्यसंपदा आहे. संध्याकाळी गणपतीपुळ्यापासून जवळ असलेल्या आरेवारे समुद्रकिनाऱ्याला भेट दिली. फारच शांत, सुंदर आणि स्वच्छ समुद्रकिनारा आहे. दुसऱ्या दिवशी आम्ही गणपतीपुळ्यापासून साधारण ३५ कि.मी. अंतरावर असलेल्या मार्लेश्वरला साधारण पाचशे पायऱ्या चढून वर जावं लागतं. पायऱ्यांपासून वरपर्यंत अगी वेगवेगळ्या प्रकारची खेळण्यांची, सरबतांची, प्रसादाची दुकानं आणि हॉटेल्स आहेत. बऱ्याच ठिकाणी वाटेमध्ये गोड कोकम विकायला असतात. वरती चढून गेल्यावर असं लक्षात आलं की, हे मंदिर म्हणजे एक गुहाच आहे आणि आत जायला एकदम छोटी व अरुंद जागा आहे. मंदिरात खूप काळोख होता. अशा प्रकारे आमची कोकण ट्रिप फारच सुंदर आणि अविस्मरणीय झाली.

– **केतकी देवधर-विद्वांस,** खोपोली

# कीटकडंखाचे वेदनामापन

गांधीलमाशा, मुंग्या, मधमाश्यांसारख्या कीटकांची भीती आपल्याला त्यांच्या डंखामुळे वाटते. डॉ. जस्टिन श्मिडट या अमेरिकन कीटकशास्त्रज्ञाने या कीटकांच्या डंखावर किंवा स्टिंगवर प्रदीर्घ संशोधन केले. पन्नास वर्षांच्या संशोधनामधून त्यांचे 'श्मिडट स्टिंग पेन इंडेक्स' हे डंखाचे वेदनामापन शास्त्र विकसित केले. प्रयोगादरम्यान त्यांना सुमारे १५० प्रजातीच्या कीटकांचा हजारो वेळा, अनवधानाने डंख झाला. या अनुभवाच्या त्यांनी नोंदी ठेवल्या आणि त्यामधून ८३ कीटक प्रजातींच्या डंखाच्या वेदनांचे वर्गीकरण एक ते चार अशा मापनावर केले. उदा. पहिल्या पातळीमध्ये काही मुंग्या येतात आणि सूक्ष्म चटका बसून हातावरचा एखादा केस जळाल्याप्रमाणे त्यांच्या डंखाची वेदना होते. मधमाशीचा डंख दुसऱ्या पातळीवरील, जलद पण कमी काळ टिकणारी वेदना उत्पन्न करतो. तिसऱ्या पातळीवर गांधीलमाशांच्या डंखामुळे होणारी वेदना ही जळजळणारी, तीव्र असते. तर बुलेट मुंगी चावल्यावर होणारी चौथ्या पातळीवरची वेदना ही अत्यंत तीव्र असून त्याचे वर्णन डॉ. श्मिडट 'टाचेमध्ये तीन इंची खिळा घुसलेला असताना पेटत्या कोळशांवरून चालत गेल्याप्रमाणे होणारी वेदना' असे करतात.

विषग्रंथीच्या जैवरासायनिक अभ्यासातून आणि स्वानुभवातून डॉ. श्मिडट यांच्या असे लक्षात आले की, डंखाच्या विषामधील रसायनांच्या मिश्रणावरून वेदनांची तीव्रता आणि त्यावर होणारी आपल्या शरीराची प्रतिक्रिया अवलंबून असते. 'द स्टिंग ऑफ द वाइल्ड' या त्यांच्या जगप्रसिद्ध पुस्तकामध्ये डंख मारणाऱ्या कीटकांचे विश्व उलगडून दाखवले आहे. हे कीटक भक्ष्याला मारण्यासाठी, प्रतिस्पर्धी कीटकाला नमवण्यासाठी किंवा माणसांपासून स्वत:ला वाचवण्यासाठी डंख मारतात. 'किंग ऑफ स्टिंग' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या जगावेगळ्या शास्त्रज्ञाचे दुर्दैवाने २०२३ मध्ये पार्किन्सन आजाराने निधन झाले. त्यांचे कीटकविष आणि वेदनामापनावरील संशोधन जगभरातील कीटकसंशोधकांसाठी अमूल्य आहे.

**– डॉ. राहुल मराठे, नूतन कर्णिक**


---

## सहवेदना

# ज्येष्ठ तबलावादक पं. खांबेटे यांचे निधन

ज्येष्ठ तबलावादक पं. शेखर खांबेटे (७१) यांचे बुधवारी सकाळी पुण्यात निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, मुलगी, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. खांबेटे यांच्या पार्थिवावर सायंकाळी वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

ज्येष्ठ तबलावादक, उत्तम संगीत अभ्यासक, संवादक आणि सर्व प्रकारच्या संगीतकार मार्मिक भाष्य करणारे चतुरस्र कलावंत अशी खांबेटे यांची ओळख होती. खांबेटे मूळचे दादरचे. गिरगावमधील पं. श्रीधर पाध्ये यांच्याकडे त्यांनी तबल्याचे शिक्षण घेतले. नाट्यसंगीतासह विविध संगीत प्रकारांचा त्यांचा अभ्यास आणि व्यासंग होता. त्यांनी अनेक कलाकारांना विशिष्ट संकल्पनांच्या कार्यक्रमात तबला साथसंगत केली. रिझर्व्ह बँकेतील अधिकारी पदावरची नोकरी सांभाळून त्यांनी अनेक मान्यवर दिग्दर्शक, विजया मेहता, पु. ल. देशपांडे, विनय



आपटे, ज्येष्ठ संगीत अभ्यासक डॉ. अशोक रानडे यांच्याबरोबर सांगीतिक कार्यक्रमांना तबला, पखवाज आणि इतर तालवाद्य साथ केली.

पं. राम मराठे, नटवर्य भालचंद्र पेंढारकर, डॉ. अशोक रानडे, रामदास कामत, पं. गोविंदराव पटवर्धन, आशा खाडिलकर, चंद्रचूड वासुदेव, शरद जांभेकर, डॉ. विद्याधर ओक यांसह अनेकांबरोबर वादन केले. करोना काळातही त्यांनी संगीत सेवा सुरूच ठेवली. सलग तीन–चार वर्षे दुर्मीळ व्हिडिओ आणि काही सांगीतिक ऑनलाइन कार्यक्रम यू–ट्यूबवर प्रसिद्ध करून एक अनमोल सांगेतिक ठेवा रसिकांसमोर सादर केला. सांगीतिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल खांबेटे यांना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले होते.

# सहवेदना

**ज्येष्ठ तबला वादक शेखर खांबेटे यांचे २८ ऑगस्ट २०२४ रोजी निधन झाले.**

शेखर खांबेटे यांचा जन्म ७ सप्टेंबर १९५३. तबला नवाज पंडित यशवंतराव केरकर यांच्या शिष्यपरंपरेतील पं. श्रीधर पाध्ये यांचे शेखर खांबेटे हे शिष्य, त्यांनी जुन्या नव्या बहुतेक अभिजात संगीत नाटकांना तबला साथ दिली.

शेखर खांबेटे यांनी ४ थ्या इयत्तेत असताना प्रथम लोकांसमोर तबला वाजवला. ते एक असं वय असतं की मंचभय वगैरे काही नसतं. त्याचा पुढे त्यांना फार फायदा झाला. शेखर खांबेटे गाण्याची तबल्यातून जी पहिली उठावाज असते ती फार छान करत असत.

शेखर खांबेटे यांनी पं. नारायणराव बोडस, शरद जांभेकर, पं. राम मराठे, वीणा सहस्त्रबुद्धे, श्रुती सडोलीकर, फैय्याज अशा अनेक गायक व गायिकांची साथ केली. शेखर खांबेटे यांचा क्लासिकल बेस उत्तम होता. त्यामुळे ते वेगवेगळ्या घराण्यांची खासियत लक्षात घेऊन वाजवत असत. पं. राम मराठे ह्यांना डिचोलीच्या कार्यक्रमात शेखर खांबेटे यांनी प्रथम साथ केली. पं. राम मराठ्यांची साथ करायची म्हणजे येऱ्या गबाळ्याचं काम नव्हते.

शेखर खांबेटे यांनी अनेक संगीत नाटकांनासुद्धा साथ केली. संगीत नाटक टिकलं पाहिजे हे शेखर खांबेटे यांचे प्रामाणिक मत होते. त्यांचे कायम म्हणणे असे की, आजच्या आधुनिक तंत्राचा तबलजीनेसुद्धा अभ्यास करायला पाहिजे.तसेच शेखर खांबेटे यांनी अनेक नवीन संगीत नाटकाची साथ केली. पं. जितेंद्र अभिषेकींनी स्वरबद्ध केलेल्या धाडिला राम तिने का वनी या नाटकाच्या पहिल्या प्रयोगाची साथ केली. हयवदन नाटकात पात्रांच्या हालचाली नुसार त्यांनी रिदम बसवला होता. त्यानंतर शेखर खांबेटे यांनी कधी तरी कोठे तरी, कांते फार तुला मजसाठी ह्या नाटकांतही तबल्याची साथ केली.

शेखर खांबेटे कलावंताची मैफिल सुंदर व्हावी ह्या भावनेने साथीला बसत. ते नुसते अनुचर नाहीत तर कलावंताचे सहचर होते. तरबेज गायक असेल तर त्याला आणखी पूरक काय वाजवायचं आणि नवीन गायक असेल तर त्याला कसं सांभाळून घ्यायचं ह्या सगळ्या खुब्या त्यांना ठाऊक होत्या. शेखर खांबेटे कधी ट्रबलजी झाले नाहीत ते अप्रतिम तबलजीच राहिले.

शेखर खांबेटे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**संजीव वेलणकर**, पुणे.
९४२२३०१७३३

*संदर्भ: इंटरनेट ही व इतर पोस्ट*
*माझ्या फेसबुक पेजवर पाहू शकता.*



बोरवाडी त. माणगाव जि. रायगड येथील भाऊ उर्फ यशवंतराव मराठे सर यांचे २६-०७-२४ रोजी दुखःद निधन झाले.

निजामपूर मधील मेथा हायस्कूल मध्ये ते अनेक वर्ष मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होते. निजामपूर मध्ये नवोदय विद्यालय स्थापन करण्यात त्यांचा मुख्य वाटा होता. तसेच बोरवाडी येथे माऊली वृध्दाश्रम स्थापन करण्यातही त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे.

कुटुंबीयांना ईश्वर बळ देवो, त्यांच्या आत्म्यास सद्गती लाभून चिरशांती मिळो ही ईश्वराजवळ प्रार्थना.



श्रीनिवास गोपाळराव मराठे यांची मोठी बहीण (पुर्वाश्रमीच्या निर्मला गोपाळराव मराठे) श्रीमती उषा लक्ष्मण ताम्हनकर. हिचे वयाच्या ८७व्या वर्षी रविवार दिनांक ११-०८-२४ रोजी दुःखद निधन झाले.



श्रीनिवास गोपाळराव मराठे यांची बहीण (पुर्वाश्रमीच्या सुनंदा गोपाळराव मराठे) श्रीमती जयश्री विजय फडके वास्तव्य पुणे येथे १६-०६-२४ रोजी निधन झाले.

श्री. वासुदेव दत्तात्रय मराठे ह्यांना वयाच्या ९८व्या वर्षी ता. ०७-०९-२४ रोजी वृद्धापकाळाने देवाज्ञा झाली.

धनंजय मराठे (मुलगा) सौरभ मराठे (नातू)

आपले कार्योपाध्यक्ष शैलेंद्र मराठे यांचा सख्खाचुलत भाऊ जयंत मराठे यांचे अमेरिका येथे वयाच्या ८६व्या वर्षी १९-०७-२४ रोजी दुःखद निधन झाले.

## रोझ कोकोनट बॉल



**साहित्य :** दोन कप खवलेला नारळ, पाव कप रवा, दीड कप दूध, दोन टेबलस्पून फ्रेश क्रीम किंवा साय, दीड कप पिठीसाखर, दोन टीस्पून तूप, पाव टीस्पून व्हाइट रोझ इसेन्स, चार ते पाच थेंब गुलाबी रंग, दोन टेबलस्पून सुक्या गुलाबाच्या पाकळ्या.

**कृती :** एक जाड कढई घ्या. त्या कढईत दूध, साय उकळून घ्या. त्यात पिठीसाखर घाला. नंतर त्यात डेसिकेटेड कोकोनट आणि रवा घालून छान शिजवून घ्या. पुढे त्यात कलर, तूप घाला. छान गोळा होईपर्यंत एकसारखे परतून घ्या. नंतर त्यात इसेन्स घालून मिश्रण एकजीव करा. मिश्रण कोमट झाल्यावर त्याचे बॉल करून डेसिकेटेट कोकोनटमध्ये घोळवून घ्या. नंतर छानशा ताटात काढा. अशा प्रकारे बाप्पासाठी स्वादिष्ट प्रसाद तयार.

## अळीवाचा हलवा



**साहित्य :** दोन कप खोवलेला ओला नारळ, अर्धा कप अळीव, दोन टीस्पून तूप, एक कप गूळ, एक टीस्पून वेलदोड्याची पावडर, काजू, बदामाचे काप, आवडीनुसार बेदाणे, दोन टेबल स्पून खारकेची पावडर.

**कृती :** अळीव हलकेच भाजून घ्या. पंधरा मिनिटं पाण्यात भिजत ठेवा. नंतर कढईत तूप घालून त्यात खोवलेला नारळ घालून थोड परतून घ्या. नंतर त्यात गूळ घाला आणि छान एकजीव करा. मिश्रणामध्ये खड्डा करून त्यात अळीवाचं मिश्रण घाला आणि त्यावर झाकण ठेवून मंद आचेवर पाच मिनिटं ठेवा. नंतर ड्रायफ्रूट्स, खारकेची पावडर घालून एकजीव करा. नंतर परत दोन मिनिटं मंद गॅसवर झाकून ठेवा. वेलदोडे, जायफळाची पावडर घालून एकजीव करा. तयार झालेला हलवा नैवेद्याच्या ताटात वाढून घ्या.

## ड्रायफ्रूट मोदक



**साहित्य :** दीड कप बिया काढलेला खजूर, काजू, बदाम, पिस्ते (सर्व मिळून एक कप), तीन टीस्पून तूप, सजावटीसाठी चांदीचा वर्ख.

**कृती :** एका भांड्यात सर्व साहित्य एकत्र करा. एकत्र केलेलं सगळं साहित्य मिक्सरमधून बारीक करून घ्या. नंतर सर्व एकत्र करून छान एकजीव करून ते मिश्रण मोदकाच्या साच्यात घालून मोदक करा. गॅस, मायक्रोवेव्ह न वापरता छान असा गणपती बाप्पांचा प्रसाद दहा मिनिटांत तयार!

## नमकीन पोहे



**साहित्य :** दोन कप कांदा पोह्यासाठी वापरत असलेले पोहे, काजू, बेदाणे, अर्धा कप बदामाचे काप, अर्धा कप तूप, तीन हिरव्या मिरचीचे तुकडे, अर्धा कप खोवलेला ओला नारळ, अर्धा कप चिरलेली कोथिंबीर, प्रत्येकी अर्धा टीस्पून सेंदेलोण-पांदेलोण, दोन टी स्पून गुळाची पावडर किंवा साखर, चवीनुसार मीठ.

**कृती :** कढई घ्या आणि त्यात तूप घाला आणि ते छान तापवून घ्या. तापलेल्या तुपात ड्रायफ्रूट्स तळून घ्या. नंतर राहिलेल्या तुपात हिंग, मिरच्या घालून पोहे घाला आणि ते छान परतून घ्या. नंतर त्यात तळलेले ड्रायफ्रूट्स, सेंदेलोण, पादेलोण, मीठ, गूळ घालून पोहे छान एकजीव करा. नंतर त्यात ओलं खोबरं, कोथिंबीर घालून पोहे एकजीव करा. गणपती बाप्पासाठी चटपटीत नमकीन पोह्यांचा नैवेद्य तयार.

## शाही रोल (गॅस, मायक्रोवेव्ह न वापरता)




**साहित्य :** एक कप फुटाणा डाळीचं पीठ, एक कप मिल्क पावडर, एक कप पिठी साखर, अर्धा कप काजू, बदाम, पिस्ते यांची एकत्र पावडर, एक कप तूप, अर्धा टी स्पून व्हॅनिला इसेन्स.

**सारण :** अर्धा कप गुलकंद, अर्धा कप सुक्या खोबऱ्याचा किस, पाव कप काजू, बदाम, पिस्त्याचे काप, सर्व एकत्र करून एकजीव करून घ्या.

**कृती :** एका भांड्यात फुटाणा डाळीचे पीठ, मिल्क पावडर, ड्रायफ्रूट पावडर, पिठीसाखर व्हॅनिला इसेन्स एकत्र करा. त्यात तूप पातळ करून घाला. तसंच लागेल तसं तूप घालून छान गोळा करून घ्या. या मिश्रणाच्या छोट्या पाऱ्या करून त्यात सारण भरा आणि त्याला बंद करून रोलचा आकार द्या. डेसिकेटेड कोकोनट बदाम, पिस्त्याचे काप यामध्ये हा रोल घोळवून घ्या. बाप्पासाठी शाही नैवेद्य तयार...!

## वाटली डाळ



**साहित्य :** एक कप हरभरा डाळ, चार हिरव्या मिरच्या, एक टीस्पून चिरलेलं आलं, चवीनुसार मीठ, दोन टीस्पून साखर, आवडीनुसार लिंबूरस, प्रत्येकी पाव कप ओलं खोबरं आणि कोथिंबीर, चार टेबलस्पून तेल, फोडणीसाठी जिरे, मोहरी, कढीपत्ता, हिंग, हळद (प्रत्येकी पाव टीस्पून.)

**कृती :** हरभरा डाळ स्वच्छ धुवून पाच ते सहा तास भिजवून घ्या. नंतर परत धुवून घ्या. मिक्सरच्या भांड्यात जिरे, मिरची, आलं वाटून घ्या. त्यातच डाळदेखील वाटून घ्या. एक जाड भांडं घ्या आणि त्यात तेल तापवा. नंतर त्यात जिरे, मोहरी, कढीपत्ता, हिंग, हळद घाला. त्यात वाटलेलं डाळीचं मिश्रण, मीठ, साखर घालून छान परतून घ्या. थोडे पाणी शिंपडून त्यावर झाकण ठेवा आणि मंद आचेवर वाफेवर शिजवून घ्या. मध्ये-मध्ये ते मिश्रण परतत राहा. खोबरं, कोथिंबीर घालून बाप्पासाठी खमंग प्रसाद तय्यार!

---

## पाककृती

### खजूर



*खजूर दुधात मिसळून मिल्क शेक बनवा...*

**कसा होईल फायदा :** खजूर आणि दुधामध्ये उपलब्ध कॅल्शियम आणि प्रोटीन मसल्स मजबूत बनवतील. यातील कार्ब्समुळे पचनतंत्र चांगले राहते.

### अंजीर



*भरडलेल्या धान्यामध्ये मिसळून खावे...*

**कसा होईल फायदा :** अंजीर आणि भरडलेले धान्य (सुजी) दोन्हीमध्ये अँटीऑक्सीडेंट असते, जे वाढत्या वयाचा प्रभाव कमी करते. मेटॅबॉलिझम सुधारतो.

### बदाम



*बदाम पाण्यात भिजवून खावेत...*

**कसा होईल फायदा :** बदामाच्या सालीमध्ये टॅनिन नावाचे ॲसिड असते. बदाम पाण्यात भिजवल्याने हे ॲसिड बदामाच्या आत जाते. हे जास्त फायदेशीर आहे.

### अक्रोड



*अक्रोड सलाडमध्ये मिसळून खावे...*

**कसा होईल फायदा :** अक्रोड आणि सलाड दोन्हीमध्ये फायबर असते. यामुळे वजन कमी होईल आणि डायजेशन ठीक राहील.


# SPECIFI AI APPLICATION

• परिमल मराठे, संभाजीनगर

भ्रमणध्वनी : ८९७–५५६–७५७४

Specific AI applications in the construction industry that are reshaping how projects are designed, managed, and executed:

1. **AI in Design and Planning**
   - Generative Design Tools: AI software like Autodesk's Generative Design can create thousands of design permutations based on input constraints such as materials, building codes, or energy efficiency goals. It helps optimize the design phase by evaluating numerous scenarios rapidly.




   - Parametric Design: AI allows architects to explore multiple configurations and optimize structures for performance, cost, and environmental factors. For example, buildings can be designed to optimize energy consumption using AI to Model how sunlight will affect the structure.
2. **AI in Construction Site Management**
   - Drones and AI Integration: AI-powered drones can capture high-resolution images and videos of construction sites, and AI algorithms can analyze this data to identify areas needing attention, monitor work progress, and detect potential safety hazards.
   - Site Monitoring with Computer Vision: AI-based computer vision tools can monitor worker behavior, equipment use, and material deliveries. It can identify unsafe practices, noncompliance with regulations, and quality issues in real-time.
   - Real-time Project Adjustments: AI can track real-time progress through cameras and sensors and compare it with the project plan, flagging delays and allowing for quick adjustments.
3. **AI for Predictive Maintenance**
   - Equipment Monitoring: AI tools can predict when construction equipment, such as cranes or bulldozers, will require maintenance, thus preventing costly breakdowns and reducing downtime. By analyzing the machine's performance, vibration, and wear patterns, AI can schedule maintenance optimally.
   - Infrastructure Monitoring: AI-driven IoT sensors embedded in infrastructure can track the condition of structures in real-time (e.g., bridges, buildings) and alert when repairs or preventive measures are needed, prolonging asset life.
4. **AI in Project Management and Scheduling**
   - AI-Powered Scheduling: AI tools like ALICE are being used to optimize construction schedules. By simulating different construction scenarios and resource allocations, these tools help develop the most efficient project timelines and workflows.
   - Cost Estimation and Budget Management: AI can estimate project costs more accurately by analyzing historical data and current project parameters, helping avoid budget overruns.
   - AI Chatbots and Virtual Assistants: AI-driven bots can automate many administrative tasks like answering queries from clients, updating team members on project status, and sending reminders for deadlines.
5. **AI in Safety and Risk Management**
   - Worker Safety Monitoring: AI systems, coupled with wearables like smart helmets or vests, can monitor worker vital signs (such as heart rate, body temperature) and environmental factors (like air quality) to prevent accidents, alerting managers in case of risky conditions.
   - Accident Prediction: AI analyzes historical site data to predict potential safety hazards. This could involve identifying high-risk areas of a site or predicting where accidents are more likely to occur based on past incidents.
   - Quality Control via AI: AI tools can inspect the quality of materials used in construction by analyzing images or data from site inspections, ensuring materials meet the necessary standards and reducing human error.

6. **AI in Supply Chain and Procurement**
   - Supply Chain Optimization: AI algorithms can predict potential bottlenecks in the supply chain by analyzing external factors like weather conditions, transportation delays, and market trends, allowing for proactive planning.
   - Just-in-Time Delivery: AI can streamline material delivery schedules based on realtime project progress, reducing storage costs and ensuring that materials arrive exactly when needed.
7. **AI in Sustainability and Environmental Impact**
   - Energy-Efficient Building Design: AI helps architects and engineers design structures that use minimal energy by optimizing heating, cooling, and lighting systems. AI tools can model energy performance and suggest sustainable materials.
   - Waste Management: AI can analyze construction processes to identify areas where materials are being wasted and recommend strategies to reduce waste, saving costs and minimizing environmental impact.
8. **AI for Workforce Optimization**
   - AI for Skill Matching: AI tools can match workers to tasks based on their skills and availability, ensuring the most qualified person is assigned to each task, reducing time wasted due to misallocated resources.
   - Worker Productivity Tracking: AI can assess the productivity of workers by analyzing site data and providing insights into where labor resources are being under- or overutilized.
9. **AI in Building Information Modeling (BIM)**
   - Real-Time Data Integration: AI enhances BIM by integrating real-time data from IoT sensors, drones, and other devices. This allows teams to monitor the status of a building's lifecycle, track material usage, and update designs dynamically.
   - Dispute Resolution: AI can identify conflicts in design or construction data early, such as clashes between plumbing and electrical plans, avoiding costly rework later in the project.
10. **AI in Smart Cities and Infrastructure**
    - Smart Infrastructure Monitoring: AI in combination with IoT devices can monitor large infrastructure projects like highways, airports, or urban developments. This allows for realtime adjustments based on traffic data, environmental impact, or changing weather conditions.
    - Traffic and Urban Planning: AI can analyze traffic patterns and population growth data to design infrastructure that adapts to future needs, reducing the impact of overpopulation or unexpected urban challenges.

**Conclusion: Is AI Going to End Laborious and Tedious Work?**

AI's impact on construction will transform the industry, allowing for faster, safer, and more efficient workflows. While AI will significantly reduce laborious and tedious tasks, especially in data handling, manual monitoring, and low-skill labor, it will not entirely eliminate the need for human workers. The focus will shift from repetitive manual tasks to roles that require creativity, critical thinking, decision-making, and supervision of AI systems.

The industry's workforce will need to adapt by learning new skills, including operating AI systems and analyzing the data they generate. Rather than replacing human workers, AI will augment their capabilities, creating more value-driven roles in construction.

Disclaimer- All data and information provided herein are for informational purposes only. All rights and credits belong to their respective owners*

Stay tuned with Progressive Expert Consulting Pvt. Ltd. For Trainings and consultancy Services

©Parimal Marathe
PECPL
Vision that build values
18 Bhadrapad shaka 1946
Indian National Calendar

पाककृती

**काजू**

*काजू ओट्समध्ये मिसळून खावेत...*



**कसा होईल फायदा :** काजू ओट्ससोबत खाल्याने यामध्ये कॅल्शियम, प्रोटीनचे प्रमाण वाढेल. ज्यामुळे मसल्स मजबूत होतील, तब्येत सुधारेल.

**शेंगदाणे**

*शेंगदाणे गुळासोबत खावेत...*



**कसा होईल फायदा :** शेंगदाणे आणि गुळामध्ये प्रोटीन, आयर्न असते जे मसल्सना मजबूत बनवते आणि रक्ताची कमतरता दूर करते.

**पत्रव्यवहाराचा पत्ता :** संपादिका : डॉ. सौ. सुमेधा मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई – ४०० ०३१
भ्रमणध्वनी : ९८२०२३२०८२/८४३३६७४२२७ • इ–मेल : **hitguj@marathepratishthan.org**
• वेबसाईट : **www.marathepratishthan.org**